## राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरकार मदत करणार



**मुंबई** : राज्यातील आठ जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला असून १३ हजार ७२९ हेक्टरील पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने गहू, ज्वारी, हरभरा, मका, द्राक्ष, आंबा, पपई, संत्री या पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागाची तत्काळ माहिती शासनाने मागितली आहे. हा अहवाल आल्यावर त्यानुसार या शेतकऱ्यांना सरकारकडून मदत करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ८) अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना दिली. सभागृहात उपमुख्यमंत्री फडणवीस हे माहिती देत असताना विरोधकांनी गोंधळ घातला. त्या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी, राजकारण करू नका. हा शेतकऱ्यांचा विषय आहे. शेतकऱ्यांना आम्ही मदत करणार आहोत, असे सांगितले.

गुरुवार, ९ मार्च २०२३

# रामप्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २२९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

### अंतरंग

खारेपाट विभागातील महिलांची पाण्यासाठी जि.प.वर धडक/२
रोहा सानेगाव रस्त्यालगत आढळला महिलेचा मृतदेह/५
आजपासून भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया चौथी कसोटी/८

### महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल जाहीर

# आज सादर होणार अर्थसंकल्प

**मुंबई : प्रतिनिधी**

विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री तथा राज्याचे वित्त व नियोजनमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. ८) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३चा अहवाल सादर केला. या पाहणीच्या पूर्वानुमानानुसार राज्याच्या अर्थव्यवस्थेत ६.८ टक्के, तर देशाच्या अर्थव्यवस्थेत सात टक्के वाढ अपेक्षित आहे. सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक म्हणजे १४ टक्के इतका आहे. दरम्यान, राज्याचा अर्थसंकल्प गुरुवारी (दि. ९) सादर होणार आहे.



आर्थिक पाहणी अहवालानुसार सन २०२२-२३मध्ये राज्याच्या कृषी व संलग्न कार्ये क्षेत्रात १०.२ टक्के वाढ अपेक्षित असून उद्योग क्षेत्रात ६.१ टक्के आणि सेवा क्षेत्रात ६.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. पूर्वानुमानानुसार २०२२-२३मध्ये सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ३५,२७,८४ कोटी अपेक्षित आहे आणि वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २१,६५,५५८ कोटी अपेक्षित आहे. दरडोई राज्य उत्पन्न २,४२,२४७ अपेक्षित आहे. २०२१-२२मध्ये ते २,१५,२३३ होते.

२०२२-२३करिता राज्याची महसूली जमा ४,०३,४२७ कोटी, तर सुधारित अंदाजानुसार सन २०२१-२२ करिता ३,६२,१३३ कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाजानुसार कर महसूल व करेतर महसूल अनुक्रमे ३,०८,११३ कोटी आणि ९५,३१४ कोटी आहे. एप्रिल ते नोव्हेंबर २०२२ या कालावधीत प्रत्यक्ष महसूली जमा २,५१,९२४ कोटी आहे. राज्याचा महसूली खर्च ४,२७,७८० कोटी अपेक्षित असून सुधारित अंदाजानुसार ३,९२,८५७ कोटी आहे.

अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२२-२३करिता एकूण जमेतील भांडवली जमेचा हिस्सा २६.५ टक्के अपेक्षित असून एकूण खर्चातील भांडवली खर्चाचा हिस्सा २२.० टक्के अपेक्षित आहे. सुधारित अंदाजानुसार सन २०२१-२२करिता एकूण महसूली खर्चातील विकासावरील खर्चाचा हिस्सा ६७.८ टक्के आहे, असे फडणवीस यांनी सांगितले.

### सीकेटी स्वायत्त महाविद्यालयाचा

# रौप्य महोत्सवी समारंभ





### मंत्री चंद्रकांत पाटील आणि माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांची लाभणार प्रमुख उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दर्जेदार शिक्षणासोबत कला, क्रीडा, सामाजिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयाला २५ वर्षे झाली आहेत. त्या अनुषंगाने महाविद्यालयाचा दोन दिवसीय रौप्य महोत्सव समारंभ येत्या शनिवारी (दि. ११) राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील व रविवारी (दि. १२) मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे.

महाविद्यालय २५ वर्षे पूर्ण करून जी यशस्वी वाटचाल करीत आहे त्याचे श्रेय संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना जाते. रौप्य वर्ष महोत्सवानिमित्त ११ मार्च रोजी संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे, तर संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, वर्षा ठाकूर, संजय भगत, राज अलोनी, प्रकाश भगत, हरिश्चंद्र पाटील, भरत ठाकूर, संजय पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, **(पान २ वर..)**

#### उत्तम कामगिरी अन् यशस्वी वाटचाल!

सीकेटी महाविद्यालयाला सन २००६मध्ये पहिल्या नॅक मूल्यांकनामध्ये 'अ' दर्जा प्राप्त झाला. सन २००८-०९मध्ये मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयाला बेस्ट कॉलेज अवॉर्ड देऊन सन्मानित केले. आविष्कार रिसर्च कन्वेन्शन हा मुंबई विद्यापीठाचा संशोधनावर आधारलेला उपक्रम ज्यामध्ये राज्यातील सर्व म्हणजे जवळजवळ ८५० महाविद्यालये सहभागी होतात. २००९-१०मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमात सलग नऊ वर्षे सीकेटी महाविद्यालय चॅम्पियनशिप मिळवित आहे. त्यानंतर २०१२-१३च्या शैक्षणिक वर्षात पुन्हा एकदा महाविद्यालयाला मूल्यांकनामध्ये 'अ' दर्जा व २०१७-१८मध्ये 'अ+' दर्जा प्राप्त झाला, तर शैक्षणिक वर्ष २०१९-२०मध्ये युजीसीकडून स्वायत्त दर्जा महाविद्यालयाला प्राप्त झाला आहे.

# नागालँड आता विरोधकमुक्त!

### राष्ट्रवादी काँग्रेसचा भाजपप्रणित सरकारला पाठिंबा

**कोहिमा : वृत्तसंस्था**



नागालँडमधील एनडीपीपी-भाजप आघाडी सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसने घेतला आहे. कोहिमाममध्ये झालेल्या राष्ट्रवादी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नागालँडमध्ये आता विरोधी पक्ष उरला नाही.

नागालँडमध्ये नेफ्यू रियो यांच्या नेतृत्वातील एनडीपीपी-भाजप सरकार सत्तेवर आले आहे. ६० आमदारांच्या नागालँड विधानसभेत एनडीपीपीचे २५ आमदार निवडून आले आहेत. भाजपने १२ जागांवर विजय मिळवला, तर राष्ट्रवादी काँग्रेसने सात जागी यश मिळविले आले. राष्ट्रवादीने एनडीपीपी-भाजप सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकात राष्ट्रवादीने म्हटलेय की, ४ मार्चला कोहिमा येथे झालेल्या बैठकीत विधिमंडळ पक्षनेते, उपनेते, प्रमुख प्रतोद आणि प्रवक्ते यांची निवड करण्यात आली तसेच सरकारला पाठिंबा द्यायचा की विरोधी पक्षात राहून काम करायचे यावरही चर्चा झाली. यात नवनियुक्त आमदारांनी आणि स्थानिक पक्षनेत्यांनी राज्याच्या व्यापक हितासाठी मुख्यमंत्री रिओ यांच्या नेतृत्वातील एनडीपीपी सरकारचा भाग घेण्याचा निर्णय घेतला आहे.

## खेडच्या सभेला बाहेरून लोक आणले होते -ना. राणे

**मुंबई : प्रतिनिधी**



ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची अलीकडेच रत्नागिरीतील खेड येथे जाहीर सभा झाली. या सभेवर केंद्रीय मंत्री व भाजप नेते नारायण राणे यांनी टीका करीत प्रतिक्रिया दिली आहे. ते मुंबईतील विधानभवनाबाहेर प्रसारमाध्यमांशी संवाद साधत होते.

उद्धव ठाकरेंची खेड येथील सभा पूर्वनियोजित होती. पूर्वी शिवसेनाच्या सभा व्हायच्या तेव्हा सगळे लोक स्वतःहून जायचे. आता तसे नाही. मुंबई, रायगड आणि रत्नागिरीहून लोकांना सभेसाठी आणले होते. ही सभा विराट सभा होती हे दाखविण्यासाठी सभेतील खुर्च्यांमध्ये दोन लोक झोपतील एवढी जागा सोडली होती, असे ना. राणे म्हणाले.

उद्धव ठाकरे अडीच वर्षांत अडीच तास मंत्रालयात गेले. त्या माणसाकडून जनता काय अपेक्षा ठेवणार. आगामी निवडणुकीपर्यंत उरलेले १५ आमदारही त्यांच्या हाताशी राहणार नाहीत, असा दावाही ना. नारायण राणे यांनी या वेळी केला.

## निवडक

### आमदार बच्चू कडू यांना दिलासा; जामीन मंजूर

**नाशिक** : प्रहार पक्षाचे आमदार बच्चू कडू यांना दिलासा मिळाला आहे. नाशिक येथे आंदोलनप्रकरणी त्यांना जिल्हा सत्र न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावली होती. दरम्यान, या संदर्भात वरच्या कोर्टात अपिलाच्या कालावधीपर्यंत कडू यांना १५ हजारांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे.

### देशातील आणखी २७ शहरांमध्ये मिळणार 'जिओ'ची ५जी सेवा

**मुंबई** : देशातील सर्वांत मोठी दूरसंचार कंपनी रिलायन्स जिओने १३ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील आणखी २७ शहरांमध्ये ५जी सेवा सुरू करण्याची घोषणा बुधवारी (दि. ८) केली. यासह 'जिओ'ने आतापर्यंत देशातील ३३१ शहरांमध्ये ५जी सेवांचा विस्तार केला आहे. कंपनीने एक निवेदन जारी करून ही माहिती दिली.

## अलिबागमध्ये बैलगाडी शर्यतीत जखमी झालेल्या दोघांचा मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग समुद्र किनाऱ्यावर मंगळवारी (दि. ७) बैलगाडी शर्यतीदरम्यान जखमी झालेल्या दोघांचा मृत्यू झाला आहे. विनायक जोशी (वय ७०, रा. अलिबाग) आणि राजाराम गुरव (वय ७५, रा. झिराड, अलिबाग) अशी मृतांची नावे आहेत.

अलिबाग कोळीवाड्यातर्फे धुळवडीचे औचित्य साधून मंगळवारी समुद्र किनाऱ्यावर बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम गटातील शर्यत सुरू असताना बैल उधळून गाडी प्रेक्षकांमध्ये घुसली. या दुर्घटनेत विनायक जोशी आणि राजाराम गुरव हे दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यांना अलिबाग येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने दोघांनाही अधिक उपचारासाठी मुंबईत हलविण्यास सांगण्यात आले. यापैकी विनायक जोशी यांचा मुंबईत नेत असतानाच रात्री मृत्यू झाला, तर राजाराम गुरव यांचे बुधवारी (दि. ८) सकाळी उपचारादरम्यान निधन झाले.

या अपघातप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात बैलगाडी स्पर्धेच्या आयोजकांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निरीक्षक शैलेश सणस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

गेल्या सहा महिन्यांत बैलगाडी स्पर्धेदरम्यान झालेली ही चौथी दुर्घटना आहे. यामध्ये अलिबाग तालुक्यात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे बैलगाडी स्पर्धेतील प्रेक्षकांच्या सुरक्षेचा मुद्दा चर्चेत आला आहे.

# शासनामार्फत महिलांना आत्मनिर्भर करण्याचे काम

### मंत्री गिरीश महाजन यांचे प्रतिपादन; 'महालक्ष्मी सरस'चे उद्घाटन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण महिलांना चूल आणि मूल या चौकटीतून बाहेर काढून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करून आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर करण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. महालक्ष्मी सरस ही बचत गटांच्या उत्पादित वस्तूंना मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची एक सुवर्णसंधी आहे. जनतेने या ठिकाणी भेट देऊन बचत गटातील उत्पादित वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराजमंत्री गिरीश महाजन यांनी केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि. ८) नवी मुंबईतील वाशी एक्झिबिशन सेंटर येथे भरविलेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.



ग्रामीण भागातून आलेल्या बचत गटांच्या वतीने तयार करण्यात आलेल्या विविध वस्तू, खाद्यपदार्थ, गृहोपयोगी साधन सामग्री विक्रीच्या राज्यस्तरीय महालक्ष्मी सरस प्रदर्शनाचे उद्घाटन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते झाले. ८ ते १९ मार्च या कालावधीत भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाची त्यांनी पाहणी केली व स्टॉलला भेटी देऊन विक्रीकरिता ठेवण्यात आलेल्या वस्तू व पदार्थांची माहिती घेतली.

उद्घाटन समारंभास ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेशकुमार मीना, एकात्मिक महिला बालविकास आयुक्त रूबल गुप्ता, ग्रामीण गृहनिर्माणचे संचालक राजाराम दिघे, राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत, अवर सचिव धनवंत माळी, कोकण विभागीय उपायुक्त गिरीश भालेराव, माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, पोलीस अधीक्षक संगीता अल्फान्सो उपस्थित होते.

#### *विविध कामांसाठी बचत गटांची मदत घेणार*

*मंत्री गिरीश महाजन पुढे म्हणाले की, शासनाच्या विविध कामांमध्ये बचत गटांची मदत घेता येऊ शकते. शासनाच्या आरोग्य विभागाच्या विविध योजनांची प्रचार व प्रसिद्धी, ग्रामीण व शहरी भागातील घरपट्ट्यांची वसूली अशा कामाकरिता बचत गटांची मदत घेता येऊ शकते. दरवर्षी ८.६ टक्क्यांनी वाढणाऱ्या स्तन कर्क रोगाविषयीच्या जनजागृतीसाठीदेखील बचत गटांची मदत घेण्यात येणार आहे.*

# रायगडात 'पोस्ता'ची धूम! गावकऱ्यांनी मारला मटणावर ताव

**धाटाव : प्रतिनिधी**

कोकणात होळी पेटविल्यानंतर दुसऱ्या म्हणजे धुळवडीच्या दिवशी पोस्त अर्थात मटणाचे जेवण करण्याची प्रथा आहे. यंदा एक दिवस उशिरा हा आस्वाद घेण्यात आला. त्यामुळे बुधवार (दि. ८) हा तिखटवार ठरला.

रायगडसह कोकणात बुधवारी सर्वत्र पोस्ताची धूम दिसून आली. आजही ही प्रथा प्रचलित आहे. बहुतांशी ठिकाणी होळी पेटविल्यानंतर रात्रीपासूनच ग्रामस्थ मंडळी एकत्र येऊन होळीशेजारीच पोस्ताचे मटण शिजवितात. यंदा होळीला सोमवार आल्याने पोस्ताची लगबग काही दिसली नाही, तर धुळवड मंगळवारी असल्याने अनेकांचा हिरमोड झाला. धुळवड साजरी झाली, मात्र ग्रामीण भागात महत्त्व असलेल्या जेवणावळीचा आनंद लोकांना घेता आला नाही. अखेर बुधवारी पोस्ताच्या मटणावळीवर हात मारीत दोन दिवसांची कसर भरून काढली.



होळीच्या पोस्तासाठी नेहमीच्या तुलनेत बोकडाऐवजी मेंढराच्या मटणाला अधिक पसंती दिली जाते. ही प्रथा अनेक ठिकाणी पहावयास मिळते. वर्गणीबरोबरच काही ठिकाणी गावकीच्या, आळींच्या माध्यमातून मटण शिजवून, तर काही ठिकाणी कच्च्या मटणाचे वाटप केले गेले.



(छाया : जितेंद्र जाधव)

> ***होळीच्या पोस्ताची परंपरा अनेक वर्षे सुरू आहे. गावातील ज्येष्ठ मंडळी फार पूर्वीपासून पोस्त साजरा करायची. गावात वेगळी परिस्थिती निर्माण झाली, परंतु आम्ही तरुणांनी पोस्त बंद पडू दिले नाही. अनेकांच्या परिश्रमातून व सहकार्यातून ही प्रथा अखंडितपणे सुरू आहे.***
> ***-अमीर तेलंगे, हेटवणे***

> ***पोस्ताची आम्ही आतुरतेने वाट पाहत असतो. चुलीवर शिजविलेले तसेच अनेकांचे हात लागलेल्या या मटणाची चव अप्रतिम असते.***
> ***-अमोल देशमुख, पिंगळसई***

## पावसानंतर आता कोकणात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अनेक भागांत अवकाळी पाऊस आणि गारपिटीने तडाखा दिला. यामुळे हवेत काहीसा गारवा निर्माण झाला होता, पण आता राज्यातील उकाडा पुन्हा वाढणार असून तापमान ४ ते ६ अंश सेल्सिअसने वाढण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविला आहे. कोकणात तर उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे.



फेब्रुवारी महिन्यातच तापमानात प्रचंड वाढ झाली होती. अंगाची लाही लाही होत असतानाच ५ ते ८ मार्चदरम्यान राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपिटी झाली. यामुळे काही काळ हवेत काहीसा गारवा आला, पण आता पुन्हा एकदा उकाडा वाढणार आहे. राज्यातील कमाल तापमानात मोठी वाढ दिसणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे, तर दुसरीकडे विदर्भात मात्र काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे.

# पनवेलजवळ कारची उभ्या बसला धडक; निवेदक ठार, तिघी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेलजवळील चिंचवण गावाच्या परिसरात बुधवारी (दि. ८) सकाळी उभ्या शिवशाही बसला पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या इर्टिका कारची धडक बसली. या अपघातात कारमधील एक जण ठार, तर तीन महिला जखमी झाल्या आहेत.



ठाणे येथील इव्हेंट मॅनेजमेंट करणारे सुप्रसिद्ध निवेदक दीपेश मोरे हे सहकाऱ्यांसह महाड येथील कार्यक्रम आटोपून बुधवारी सकाळी परतत होते. त्यांच्या ताब्यातील इर्टिका कार (एमएच ०४ जीएम २४९५) घेऊन ते चिंचवण गावाच्या हद्दीत आले असता शिवशाही बसचा टायर पंक्चर झाल्याने ती रस्त्यावर उभी होती. याचा अंदाज न आल्याने इर्टिका कारने शिवशाही बसला पाठीमागून धडकली. या अपघातात कारमधील दीपेश मोरे गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू पावले, तर त्यांच्यासोबत असलेल्या सहकारी रश्मी खावणेकर या जखमी झाल्याने त्यांना पनवेलच्या लाईफलाईन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे श्रद्धा जाधव व कोमल माने किरकोळ जखमी झाल्या आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# महिलांसाठी सर्वसमावेशक धोरण तयार करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात महिलांना मानाचे स्थान आहे. देशाच्या विकासात महाराष्ट्राचे मोलाचे योगदान आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या विकासात महिलांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. राज्यातील महिलांना विविध क्षेत्रात अधिकाधिक संधी निर्माण करून देणारे सर्वसमावेशक महिला धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व महिलांना सर्व क्षेत्रात समान तसेच सन्मानाचे स्थान मिळावे या अनुषंगाने जागतिक महिला दिनानिमित्त उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आधुनिक महिला धोरण तयार करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावावरील चर्चेला



फडणवीस उत्तर देत होते.

फडणवीस म्हणाले, विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या विविध गटांतील प्रत्येक महिलेचा प्रश्न वेगळा आहे. या सर्वांचा विचार करून आणि संबंधित विविध घटकांशी चर्चा करून महिला धोरणाला अंतिम स्वरूप देण्यात येत आहे. यापूर्वी राज्यात तीन वेळा महिला धोरणे राबविली गेली. ती आपापल्या परीने यशस्वी देखील झाली. तथापि कालानुरूप बदल आवश्यक असल्याने येणारे चौथे महिला धोरण आधीच्या धोरणांचा आढावा घेऊन, आजच्या महिलांच्या समस्या सोडविणारे तसेच त्यांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणारे असेल. एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के महिलांचा मानव संसाधन म्हणून विचार होईल, तेव्हाच देशाची खरी प्रगती होईल. या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विचारधारेनुसार राज्यातही लैंगिक अंतर संपवून सर्वच बाबतीत महिलांना समान स्थान देण्यात येत आहे. भारतीय संस्कृतीत स्त्रीचे स्थान आदराचे असल्याचा उल्लेख करूनफडणवीस यांनी 'राजमाता' ते 'बीजमाता' असा पुरातन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या स्त्री गौरवाच्या इतिहासाचा प्रवास कथन केला. स्त्री ही शक्ती असल्याचे सांगून संत मीराबाई, संत मुक्ताबाई, कान्हो पात्रा, जनाबाई, सखूबाई, महाराणी दुर्गवती, राजमाता जिजाऊ, महाराणी ताराबाई, राणी लक्ष्मी बाई, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाई आंबेडकर, लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, रमाबाई रानडे, भारतरत्न लता मंगेशकर, कल्पना चावला, पी. टी. उषा, मेरी कोम अशा महिलांनी आपापल्या अलौकिक कार्य केल्याचा उल्लेख त्यांनी केला. भारतीय राजकारणात मंत्री, पंतप्रधान, अध्यक्ष, सभापती, राष्ट्रपती अशी महत्वाची पदे महिलांनी सांभाळली व गाजवल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी चर्चेत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सदस्य ॲड. मनिषा कायंदे, उमा खापरे, डॉ. प्रज्ञा सातव, अंबादास दानवे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, कपिल पाटील यांनी सहभाग घेतला.

### योजना राबविण्यात महाराष्ट्र अग्रेसर राहील!

**जागतिक पातळीवर अनेक देशांच्या तुलनेत याबाबतीत भारत पुढे आहे. देशात 'बेटी बचाओ, बेटी पढाओ', 'सुकन्या समृद्धी' अशा योजनांमुळे महिला अधिक सक्षम होत आहेत. विविध योजनांमध्ये महिलांना प्राधान्य देण्यात महाराष्ट्र देशात आघाडीवर आहे. यापुढे देखील महिलांसाठीच्या विविध योजना राबविण्यात महाराष्ट्र कायम अग्रेसर राहील, यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचेही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी सांगितले.**

# होळीनंतर म्हसळ्यात दोन गटांत हाणामारी

## खारगाव येथील घटना; ११ आरोपी अटकेत

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यांतील खारगाव(बु) येथील एकाच समाजातील मंडळींची आपापसात भांडणे , हाणामारी झाल्याने ११ आरोपी अटकेत गेले आहेत.

याबाबत प्रदीप निवृत्ती पाटील वय वर्ष ३०रा. खारगाव(बु) यानी मनांत रोष बाळगून गैर कायद्यानी मंडळी एकत्र जमवून पारंपारीक होळी साजरी करताना फिर्यादीला शिवीगाळ– धक्काबुक्की केल्याने फिर्याद दिली असता. गुन्हा रजी. क्रं. २८/२०२३ भादवि कलम ३२४, ३२३, १४१, १४३, १४७, १४९, ५०४,५०६, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम१९५१ चे कलम ३७(१) (३) १३५ अन्वये गुन्हा दाखल केला असून यामध्ये ४ आरोपीना अटक केली. अशाच पद्धतीने दुसऱ्या गटांतील फिर्यादी तेजस गोवींद वेटकोळी वय २८ रा.खारगाव (बु) यानी म्हसळा पोलीसांत परस्पर विरोधीतक्रार दिली असता म्हसळा पोलीसानी गुन्हा रजी. क्रं२८/२०२३ भादवि कलम ३५४, ३२४, ३२३, १४१, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६, सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम१९५१ चे कलम ३७(१) (३) १३५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये २३ ते ४२ वयोगटाचे ७ आरोपी अटकेत आहेत. या दोन्ही गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक आर. टी. सुर्यवंशी करीत आहेत.

# शासनाचे जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार घोषित

**अलिबाग : प्रतिनिधी**

महिला व बालविकास क्षेत्रातील उत्कृष्ट काम करणाऱ्या समाजसेविकांच्या व संस्थांच्या कामाची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहित करणाच्या दृष्टीकोनातून महिला व बाल विकास विभागांतर्गत राज्यातील समाजसेविका व संस्थांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार १९९६–९७ पासून देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिला व संस्थांना दरवर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार दिला जातो.

शासनाकडून २०१३–१४ ते २०१९–२० या वर्षांचे राज्य, विभाग व जिल्हास्तरीय पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कारार्थींची निवड घोषित करण्यात आली आहे. कोकण विभागासाठी विभागीय स्तर व रायगड जिल्हास्तरीय पुरस्कारार्थींची निवड खालीलप्रमाणे घोषित करण्यात आली आहे. कोकण विभागस्तरीय पुरस्कार– २०१५–१६ करिता वनवासी विकास सेवा संघ, उसरोली, पो.मजगाव, ता. मुरुड.

२०१७–१८साठी आश्रय सोशल फाऊंडेशन, पनवेल. रायगड जिल्हास्तरीय पुरस्कार– २०१३–१४ साठी मिनल मिलिंद टिपणीस, सार्थक प्लॉट नं.४,रोड नं.७,सेक्टर १९,नवीन पनवेल. २०१४–१५ करिता– प्रमिला रोहिदास चव्हाण, मु.जामरुंग, पो. आंबिवली, ता. कर्जत. २०१५–१६ करिता– शुभांगी दत्तात्रेय झेमसे, सदनिका क्र.१११, युनिक बाजार, पेण. २०१६–१७ करिता– निहा अनिक राऊत.२०१७–१८साठी सुप्रिया विभिषण जेधे.

राज्यस्तरीय पुरस्कार– महिला व बाल विकास क्षेत्रात मौलिक कामगिरी बजावणाऱ्या समाजसेविका यांना किमान २५ वर्षाचा सामाजिक कार्याचा अनुभव असावा. ज्या महिलांनी अशा क्षेत्रात काम केले आहे, अशा महिलांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे स्वरुप रुपये १ लाख १ हजार रोख रक्कम, स्मृतीचिन्हे, शाल व श्रीफळ असे आहे. विभागीय स्तरावर पुरस्कार– ज्या स्वंयसेवी संस्थाना महिला व बाल कल्याण क्षेत्रात महिलांच्या आर्थिक सामाजिक उन्नतीसाठी, शिक्षण, पुनर्वसन, अंधश्रध्दा निर्मूलन, जनजागरण इत्यादी क्षेत्रात कार्य करण्याऱ्या संस्थांना किमान १० वर्षे कार्य केले आहे, अशा संस्थांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे स्वरुप रुपये २५ हजार १ रोख रक्कम, स्मृतीचिन्हे, शाल व श्रीफळ असे आहे.

जिल्हास्तरीय पुरस्कार– ज्या महिलांनी महिला व बाल कल्याण क्षेत्रात किमान ५ वर्ष कार्य केले आहे. अशा महिलांना हा पुरस्कार दिला जातो. पुरस्काराचे स्वरुप रुपये १० हजार १ रोख रक्कम, स्मृतीचिन्हे, शाल व श्रीफळ असे आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार ८ मार्च रोजी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये वितरीत करण्यात आले.

# खारेपाट विभागातील महिलांनी दिली जिल्हा परिषदेवर धडक

## पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

हक्काच्या पाण्यासाठी अलिबाग तालुक्यातील खारेपाट विभागातील महिलांनी महिला दिनी जिल्हा परिषदेवर धडक दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेऊन खारेपाट विभागातील गावांचा पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

रेवस पाणी पुरवठा योजना टप्पा २ मधील वैजाळी, रेवस, शिरवली, माणकुळे, नारंगी या गावातील महिलां आणि सरपंच बुधवारी जिल्हा परिषदेत दाखल झाले होते. महिला दिनाचे




औचित्य साधून या महिलांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील आणि कार्यकारी अभियंता ग्रामिण पाणी पुरवठा विभाग श्री. वेंगुर्लेकर यांची भेट घेतली. गावांना होणारा पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली. चिंचवली ग्रामपंचायत हद्दीत जल जीवन मिशन योजना अंतर्गत नळपाणी योजनेचे काम सुरु आहे. अर्णव एंटरप्रायझेस या ठेकेदाराला या कामाचा ठेका देण्यात आला आहे. सदर ठेकेदाराकडून एमआयडीसीच्या पाईपलाईनवर दोन ठिकाणी टॅप मारून दोन कनेक्शन टाकण्यात आले आहेत. यामुळे पुढील गावांना होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर परिणाम झाला आहे.

गेल्या पाच दिवसांपासून पाच गावातील २४ हजार लोकसंख्येचा पाणीपुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे नागरीकासमोर पाणी पाणी निर्माण झाली आहे. त्यामुळे संबधित ठेकेदाराकडून टाकण्यात आलेले दोन कनेक्शन तातडीने काढून टाकावीत, तसेच संबधित ठेकेदारावर उचित कारवाई करावी अशी मागणी या महिलांनी यावेळी केली आहे. अनधिकृत जोडण्यामुळे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना कुचकामी ठरत असल्याचा दावा यावेळी रेवस ग्रामपंचायतीचे सरपंच मच्छिंद्र पाटील यांनी या वेळी केला.

# विविध कार्यक्रमांनी पनवेल महापालिकेचा महिला दिन रंगला




### महिलांच्या कार्याचे कौतुक

**स्त्री आणि पुरुष ही एका रथाची दोन चाके आहेत. महापालिकेप्रमाणे सर्व कार्यालयात पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून महिला काम करत आहेत. वरिष्ठ पदांवर, महापौर पदांवरतीही महिला उत्तम पध्दतीने काम करत आहेत. सर्वच क्षेत्रात महिलांची संख्या वाढत असून त्यांचा सन्मानही वाढत आहे, असे प्रतिपादन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले.**

**पनवेल : वार्ताहर**

महिला दिनानिमित्त आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापालिकेच्यावतीने महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते.

यावेळी उपसंचालक नगररचना ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, आयुक्तांच्या सौभाग्यवती नेहा देशमुख, प्रिती डाके आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी महापालिकेच्यावतीने स्वच्छता महिला कर्मचारी तसेच आशा सेविकांना आयुक्तांच्या हस्ते साड्यांचे वाटप करण्यात आले. तसेच सर्व महिलांना कर्मचाऱ्यांना भेटवस्तु चे वाटप करण्यात आले. यावेळी उपसंचालक ज्योती कवाडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महापालिकेच्यावतीने महिला दिनाच्या निमित्ताने 'अस्तित्वाची ओळख' हा महिलांच्या आत्मविश्वासाला प्रेरणा देणारा पवित्रा सावंत यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी पवित्रा सावंत यांनी महिलांना आपल्या आयुष्यातले नकारात्मक विचार दूर करून सकारात्मक विचारांना महत्व देण्यास सांगितले. महिलांनी स्वत:ची ओळख जपली पाहिजे, स्वत: आनंदी राहीले पाहिजे, तरच आपले कुटूंब आनंदी राहू शकेल हे सांगताना त्यांनी विविध उदाहरणे सांगितली तसेच पंचतत्वांची माहिती देऊन महिलांनी या पंचतत्वाची शक्ती आपल्या रोजच्या आयुष्यात वापरण्याच्या सोप्या क्लुप्त्या सांगितल्या.

याचबरोबर सतीश कोते प्रस्तुत 'रंग कलेचा' हा महाराष्ट्रातील विविध लोककलेची, संस्कृतीची ओळख करून देणारा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी गण, गवळण, कोळी गीते, लावणी, शेतकरी गीते सादर करण्यात आली. महापालिकेच्या सर्व महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांनी टाळ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद देत कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. महापालिकेच्या महिला बालकल्याण विभागाच्यावतीने विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, कविता मोकल, प्रियांका पाटील यांचे या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य लाभले.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे मुमुर्शी, ता. महाड, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा – वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतींने वर्णन**

| सर्वे / भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३४७ | १–६३–०० | ०.७५ | श्री. हितेश मगनलाल पटेल |

**ठिकाण : महाड**
**दि. : ०९/०३/२०२३**

**सही/–**
**ॲड. कुणाल चंदणशिवे**
महाड – रायगड
मो.नं. ९६६५६८५५४४
मो. नं. ८३६९९५९८८७


पान १ वरून

# सीकेटी स्वायत्त महाविद्यालयाचा रौप्य महोत्सवी समारंभ

भागुबाई चांगू ठाकूर विधी कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य धनश्री कदम, रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड त्याचबरोबर सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, रौप्य महोत्सवी समारंभाचे समन्वयक डॉ. डी. एस. नारखेडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य यांचा सत्कार आणि महाविद्यालयातील विविध विभागांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच १२ मार्च रोजी होणाऱ्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमाचेही अध्यक्ष संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर भूषविणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे माजी कुलगुरू व राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे माजी संचालक डॉ. एस. एन. पठाण यांना आमंत्रित केले गेले आहे. सोबतच संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, मुंबई विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अजय भामरे, माजी प्र. कुलगुरू डॉ. नरेश चंद्रा, रूसा प्रकल्पाचे माजी वरिष्ठ सल्लागार डॉ. विजय जोशी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य अनिल भगत, वर्षा ठाकूर, संजय भगत, राज अलोनी, प्रकाश भगत, हरिश्चंद्र पाटील, भरत ठाकूर, संजय पाटील, माजी नगरसेवक नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, भागुबाई चांगू ठाकूर विधी कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य धनश्री कदम, रामशेठ ठाकूर कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, सीकेटी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, कला शाखेचे प्रमुख डॉ. बी. एस. पाटील, वाणिज्य शाखेचे प्रमुख डॉ. एस. बी. यादव, विज्ञान शाखेच्या प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर आणि आयक्यूएसी विभागाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

महाविद्यालयातील जडणघडणीसाठी मोलाचा वाटा उचलणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्ती, विद्यापीठाचे अधिकारी, महाराष्ट्र राज्याचे अधिकारी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी आणि उत्कृष्ट कामगिरी केलेल्या आजी व माजी विद्यार्थ्यांना या वेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

पनवेल व सभोवतालच्या परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्याधारित, व्यवसायाभिमुख तथा मूल्याधिष्ठित शिक्षण स्थानिक पातळीवर प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कर्मवीर भाऊराव पाटील आणि जनार्दन भगत यांच्या वैचारिक वारसातून सन १९९२मध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. यानंतर म्हणजेच २६ सप्टेंबर १९९७ रोजी चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेजची स्थापना करण्यात आली. याच महाविद्यालयाचा रौप्य महोत्सव येत्या ११ व १२ मार्च रोजी उत्साहात साजरा होत आहे.

चांगू काना ठाकूर महाविद्यालयाची स्थापना २६ सप्टेंबर १९९७ रोजी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली. महाविद्यालयाची स्थापना करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण व शहरी विभागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना कमी शुल्कामध्ये व्यवसायाभिमुख शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे करून भारताचा जबाबदार नागरीक बनवणे हा आहे. अनेक विद्यार्थ्यांना कमी गुणांमुळे, अधिक शुल्क व आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे इच्छा असूनही शहरामध्ये जाऊन चांगल्या प्रकारचे शिक्षण घेणे परवडत नाही. या सर्व गोष्टींचा विचार करून संस्थेने अनेक अभ्यासक्रम सुरू केले आहेत. प्रथम संस्थेने कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम सुरू केले तसेच विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार व्यावसायिक व पदव्युत्तर अभ्यासक्रमही सुरू करण्यात आले आहेत.

आजपर्यंत महाविद्यालयाने १५ पदवी, १४ पदव्युत्तर त्याचबरोबर नऊ संशोधन विभाग सुरू केले आहेत. सांस्कृतिक विभागात सीकेटी महाविद्यालयाचा मुंबई विद्यापीठात कायम दबदबा राहिलेला आहे. दरवर्षी मुंबई विद्यापीठात भरवल्या जाणाऱ्या सांस्कृतिक महोत्सवात हे महाविद्यालय मोठ्या प्रमाणात यश संपादित करीत आलेले आहे. त्याचप्रमाणे एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी अभूतपूर्व यश मिळवित आहेत. सलग दोन वेळा नवी दिल्ली येथे २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त लाल किल्ल्यावर होणाऱ्या आरडी परेडसाठी सीकेटी महाविद्यालयाच्या एनसीसीच्या कॅडेट्सची निवड झाली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त संसदेत भाषण करण्यासाठी संपूर्ण भारतातून निवड केलेल्या सात विद्यार्थ्यांपैकी महाराष्ट्रातून निवड झालेली एकमेव विद्यार्थिनी प्रिया चौधरी ही सीकेटी महाविद्यालयाची होती. एकूण आपल्या आजवरच्या वाटचालीत या महाविद्यालयाने अनेक सन्मान प्राप्त केले आहेत. त्यामुळे रौप्य महोत्सवी समारंभाला विशेष महत्त्व आहे. त्याची जोरदार तयारी सुरू आहे.


जा.क्र. उनप/पाणी पुरवठा विभाग /३७३३/२०२२–२३
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक : ०८/०३/२०२२

**उरण नगरपरिषद, उरण**
**निविदा सूचना**

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील विविध पंपावरील मोटार पंप दुरुस्ती करणे | १०,०००/– | ५००/– |
| २ | उरण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकरीता नवीन मीटर/जलमापक खरेदी करणे. | १०००/– | २००/– |
| ३ | उरण नगरपरिषदेच्या पंप हाऊसमध्ये असलेले जनरेटरची देखभाल दुरुस्ती करणे | १०,०००/– | ५००/– |
| ४ | उरण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील विविध ठिकाणच्या बोअरवेल दुरुस्त करणे. | १०,०००/– | ५००/– |

अटी/शर्ती :–

उरण नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता नवीन पाण्याचे मीटर/(जलमापक) पुरविणेकामी अनुभवी अथवा नोंदणीकृत ठेकेदारांकडून मोहोर बंद निवीदा मागवीत आहे. निवीदा दिनांक ९/३/२०२३ पासून दिनांक २०/३/२०२३ पर्यंत साय. ४:०० वाजेपर्यंतच्या मुदतीत मुख्याधिकारी उरण नगरपरिषद यांच्या नावे दाखल करणेंचे आहे.

**१. इसारा रक्कम:–** कामाची इसारा रक्कम धनाकर्ष / रोखीने नगरपरिषद लेखा विभागात दिनांक १७/३/२०२३ रोजी. सायं. ४:०० वाजे पर्यंत भरणेंचे आहे. ठेकेदार इसारा रक्कम भरणा करणार नाहीत अशा ठेकेदारांच्या निवीदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**२. कोरे निवीदा नमुने :–** को–या निवीदाचे नमुने नगरपरिषदेच्या लेखा विभागात निवीदा शुल्क ( न परतीचे ) रोखीने भरणा केल्यास दिनांक १७/३/२०२३ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये उपलब्ध होतील.

निवीदा नमुने कोणत्याही परिस्थीतीत पोस्टाने पाठविली जाणार नाहीत. सदर कामाच्या अटी/शर्ती आणि सविस्तर निवीदा सूचना पाणीपुरवठा विभागामधून उपलब्ध होणार असून इच्छूक ठेकेदारांनी पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांच्याशी संपर्क साधावा.

**सही/–**
**(राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद उरण**

## निवडक

### बसच्या धडकेत विद्यार्थ्याचा मृत्यू

**पनवेल :** तळोजा औद्योगिक क्षेत्रातील ओन्स कॉर्निंग या कंपनीच्या कामगार वाहतूक करणाऱ्या बसची एका दुचाकीस्वार विद्यार्थ्याला मागून ठोकर बसल्याने तो जागीच ठार झाला. आदई सर्कल ते सुकापूरदरम्यान ही घटना घडली असून यामध्ये १९ वर्षीय रिषवराज झा याचा अपघाती मृत्यू झाला आहे. तळोजातील ओन्स कॉर्निंग या कंपनीच्या कामगारांची वाहतूक करणाऱ्या बसचालक शिवकैलास यादव न्यू पनवेल फुड कोर्ट हॉटेलसमोर बस चालवत होता. यादवची बससमोरील स्कूटीवरून जात असलेल्या रिषवराजला मागून ठोकर बसली. बसचे चाक रिषवराजच्या अंगावरून गेल्याने तो जागीच ठार झाला. खांदेश्वर पोलीस ठाण्यात याबाबत गुन्हा नोंदविला आहे.

### बेकायदा पिस्तूल बाळगणारे अटकेत



**पनवेल :** दोन तरुणांकडून बेकायदा पिस्तूल ताब्यात घेण्यास खारघर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर १२ येथील दोन तरुणांकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती खारघर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार खारघर पोलिसांच्या पथकाने सापळा रचून दोघांनाही ताब्यात घेतले. सागर जानू ढेबे (वय २३), राहुल विश्वनाथ गायकवाड (वय २४) अशी या दोन तरुणांची नावे आहेत. हे तरुण सराईत गुन्हेगार आहे. या दोघांकडून बेकायदा बाळगलेले पिस्तूल (देशी कट्टा) ताब्यात घेण्यात आली असून हे शस्त्र कोणत्या उद्देशाने खरेदी केले, कोणाकडून खरेदी केले याबाबतचा पुढील तपास खारघर पोलीस करीत आहे.

### कुडावे गावात वाहनांना आग

**पनवेल :** तालुक्यातील कुडावे गावात रिक्षा आणि मोटरसायकलला अज्ञात व्यक्तीने आग लावून नुकसान केले याप्रकरणी शहर पोलीस अधिक तपास करत आहेत. चंद्रकांत कोंडिलकर यांनी त्यांचे ऑटोरिक्षा चुलत मामाच्या घराजवळ पार्क करून ठेवली होती. त्यानंतर ते झोपी गेले. पहाटे चारच्या सुमारास त्यांच्या पत्नीला जाग आली, तेव्हा तिला घराच्या खिडकीतून उजेड दिसला. त्यांनी घराची खिडकी उघडून पाहिली असता दुचाकीना आग लावण्यात आली होती. कुडावे येथील सुदर्शन कोंडीलकर याची मोटरसायकल (एमएच ४६ बीजे ५९५०), विराज कोंडीलकर याची जुपिटर मोटरसायकल (एमएच ४३ बी झेड ४५७१) व चंद्रकांत परशुराम कोंडीलकर यांची ऑटो रिक्षा (एमएच ४६ एसी १५८६) या वाहनांना अज्ञाताने आग लावली. यात वाहन, त्यातील कागदपत्रे व रोख रक्कम जाळून नुकसान केल्याप्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अल्पवयीन मुलगी बेपत्ता

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाणे हद्दितीतील शिर्के लेबर कॅम्प येथून एक १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे. रीतुकुमारी हरेंद्र महतो असे



या मुलीचे नाव असून वय १४ वर्षे, रंग गव्हाळ, चेहरा उभट, केस काळे, मध्यम बांधा, उंची चार फुट पाच इंच इतकी आहे. तिने अंगात लाल रंगाचा कुर्ता व काळ्या रंगाची सलवार घातलेली आहे. या मुलीला हिंदी व भोजपुरी भाषा बोलता येत असून या मुलीबाबत कोणाला काही अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस स्टेशन किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गुरव (९४०३४४२०४२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जागतिक महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात बौद्धिक सत्र व स्पर्धा







**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात १ ते ८ मार्चदरम्यान अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त वेगवेगळे बौद्धिक सत्रे व वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयात घेण्यात आलेल्या या स्पर्धा व बौद्धिक सत्रे पुढीलप्रमाणे आहेत: १ मार्च रोजी महाविद्यालयांमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन सप्ताहाचे उद्घाटन प्रस्तुत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निषा नायर यांच्या हस्ते जागतिक महिला दिन सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले तसे लिंग समानता विषयावरती वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच २ मार्च २०२३ रोजी महाविद्यालयातील मुलींसाठी स्वरक्षण यावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून दिपाली शिपुसकर (मुंबई पोलीस) यांनी उपस्थित राहून विद्यार्थींना स्वरक्षणाचे धडे दिले. ३ मार्च २०२३ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समिती व खारघर येथील अपोलो हॉस्पिटलच्या संयुक्त विद्यमाने 'लाईफ सेविंग' यावरती कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेसाठी अपोलो हॉस्पिटलचे डॉ. दिपाली बोराड यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थिनींना कॅन्सर बद्दल मोलाचे मार्गदर्शन केले.

महाविद्यालयामध्ये 'महिला सशक्तिकरण' यावरती बौद्धिक सत्राचे आयोजन ४ मार्च रोजी करण्यात आले. या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून आरती नाईक (सामाजिक कार्यकर्त्या) यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले. ६ मार्च रोजी आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व हेक्स ब्लॉग्ज सी. एच. एस. यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरोग्याची काळजी कशी घ्यावी' यावरती बौद्धिक सत्र व ओवेपेठ गावातील महिलांचे सर्वेक्षण करून सुमारे १०० महिलांना सॅनिटरी पॅडचे वाटप केले.

आंतरराष्ट्रीय महिला दिन (८ मार्च) महाविद्यालयामध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. या जागतिक महिला दिनासाठी प्रमुख प पाहुणे म्हणून ललिता बाबर भोसले (धावपटू) अर्जुन पुरस्कार विजेत्या व प्रभाकर जोशी (सीडीसी मेंबर रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय खारघर) हे उपस्थित होते. या वेळी ललिता बाबर यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनीना त्यांच्या यशाबद्दल व मैदानी खेळ आपल्या जीवनामध्ये किती महत्त्वाचे आहेत याबद्दल विद्यार्थी विद्यार्थ्यांशी संवाद चालला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. या जागतिक महिला दिन सप्ताहाचे आयोजन प्रा. अंकिता जांगिड (समन्वयक अंतर्गत तक्रार निवारण समिती) तसेच प्रा. नम्रता परीक, प्रा. प्रवर शर्मा, प्रा. भाग्यश्री शुक्ला, प्रा. डॉ. दीपिका हसीजा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हा सर्व हा सप्ताह उत्साहात व यशस्वीरित्या करण्यासाठी खूप मेहनत घेतली.

संस्थेचे माजी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सव्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे या सर्वांनी आयोजकांचे कौतुक केले व पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

## पनवेलमध्ये महिला दिनानिमित्त वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती

**पनवेल : प्रतिनिधी**

महिला दिनानिमित्त पनवेलमध्ये वाहतूक शाखेच्या महिला पोलिसांनी महिला वाहनचालकांना वाहतूक सुरक्षेबाबत मार्गदर्शन करून जनजागृती केली.



पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ निरीक्षक संजय नाले यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि. ८) पनवेल शहराच्या हद्दीत नवीन पनवेलला जोडणाऱ्या पुलाजवळ वाहतूक शाखेच्या महिला कर्मचारी अलका पाटील, कलावती बिराजदार व शकुंतला जमादार करीत होत्या. या वेळी त्यांनी हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीचालक व वाहतूकीचे नियम न पाळणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई केली.

दुचाकीवर हेल्मेट न वापरणाऱ्या महिलांना थांबवून त्यांना आज महिला दिनानिमित्त तुमच्यावर कारवाई करण्यात येत नाही, पण उद्या सोडणार नाही असे ही सांगत होत्या. काही महिला चालकांना अडवल्यावर त्यांनी डिकीतून हेल्मेट काढून घातल्याचे ही या वेळी पाहायला मिळाले.

## एक पोळी होळीची, भुकेलेल्या मुखाची!

### भाजप कामोठे मंडल अनुसूचित जातीतर्फे उपक्रम





**कामोठे : रामप्रहर वत्त**

होळीला नैवेद्य म्हणून पुरणपोळ्या अर्पण करण्याची प्रथा आहे मात्र अर्पण म्हणून करण्यात येणाऱ्या त्याच पुरणपोळीने एका गरजू भूकेल्याचे पोट भरूया! या उदात्त उद्देशाने भाजप कामोठे शहर मंडल अनुसूचित जाती यांच्यातर्फे 'एक पोळी होळीची भुकेलेल्या मुखाची' हा उपक्रम राबवण्यात आला. यासाठी कामोठे शहरातील विविध संस्था आणि मंडळे यांना होळीनिमित्त पुरणपोळ्या संकलित करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

जमा करण्यात आलेल्या पुरणपोळ्याचा उपयोग करून पनवेल येथील इम्मानुल मेरी होम या आश्रमामधील सर्व वृद्ध आणि लहान मुलांना पुरणपोळीचे जेवण देण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी भारतीय जनता पक्ष उपाध्यक्ष साधना आचार्य मॅडम ज्योती रायबोळे मॅडम, अमित गायकवाड, सचिन शिंदे भाजपा अनुसूचित जाती उपाध्यक्ष सुरेंद्र हल्लिकार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कामोठ्यामध्ये श्री गणेश मित्र मंडळाच्या नामफलकाचे अनावरण



**कामोठे : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई परिमंडळ दोन च्या वतीने विघ्नहर्ता पुरस्काराने सन्मानित कामोठे सेक्टर ३४ मधील श्री गणेश मित्र मंडळाच्या नामफलकाचे अनावरण सेक्टर ३४ मधील गणपती चौकात भाजप कामोठे शहराध्यक्ष रवींद्र जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी माजी नगरसेवक विकास घरत, गणेश मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील, भाजप कामोठे सरचिटणीस सुशील शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. मंडळाचे खजिनदार शेखर जगताप यांनी मंडळाच्या वतीने राबवण्यात आलेल्या विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली. मंडळाच्या वतीने आयोजित होळीचे पूजन मंडळाचे ज्येष्ठ सदस्य शांताराम जगताप, रमेश पानसंडे, मिलिंद पारकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मंडळाचे अमित पानसंडे, अनिल शेट्टी, सुधीर काटमोरे, राजेश धनावडे, रवी कदम, लक्ष्मण चिखले, दशरथ शिंदे, मोहन पोटे, सुनील राळे, दिलीप जाधव, सचिन तांबोळी,चंदू काळे, मंगेश साजेकर, परशुराम जमखंडे, राकेश कुरमी, तुषार क्षीरसागर,राजेश चव्हाण, अविनाश निंबाळकर आदी उपस्थित होते.



(छाया : योगेश पाटील)



**पनवेल : रायगड जि. प.चे माजी सदस्य अमित जाधव यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील, पाली देवद पंचायत समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील, के. सी. पाटील, मयुर कदम, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विवेक होन आदी उपस्थित होते. जाधव यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.**

## पर्यावरणप्रेमी संस्थेची अनोखी धुळवड

### पाणवठ्यांमधून भागवली पशू-पक्ष्यांची तहान

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) निसर्गप्रेमी, पर्यावरणप्रेमी संस्थेच्या वतीने आगळीवेगळी धुळवड साजरी करण्यात आली. फॉनचे चिरनेर उरणचे सदस्य व काही समविचारी निसर्गमित्र यांना सोबत घेऊन संघटनेचे पदाधिकारी सदस्यांनी या वर्षीही वन्यजीव अधिवासातील पाण्याच्या मृत पावलेल्या झऱ्यांना नवसंजीवनी देण्याचे कार्य केले.

एक आगळीवेगळी धुळवड व फॉनची ज्युनियर सदस्य सृष्टी ठाकूर च्या वाढदिवसाचे औचित्य साधून पशु पक्षांसाठी पाण्याचे स्रोत निर्माण करून त्यांचे तहान भागविण्याचा प्रयत्न या सामाजिक उपक्रमातून करण्यात आला.

उरण तालुक्यातील चिरनेर बापदेव परिसरातील पेरीचे पाणी या पाणवठ्यावर धुळवडीच्या दिवशी श्रमदान करून तिथे झऱ्यास पुनर्जीवित केले. बदलत्या काळात आपण आपल्या वागण्यात जसे बदल करुन घेतलेत तसे विचारात ही बदल घडवण्याची हीच ती वेळ आहे. निसर्गावरचा ताण काही प्रमाणात कमी व्हावा असा या कार्यक्रमा मागील स्पष्ट हेतू असल्याचे फॉनच्या पदाधिकारी सदस्यांनी सांगितले.

या वेळी फॉनचे संस्थापक अध्यक्ष जयवंत ठाकूर, उपाध्यक्ष राजेश पाटील, सचिव-निकेतन ठाकूर, गोरख म्हात्रे, राकेश म्हात्रे, राकेश शिंदे, प्रणव गावंड, दिनेश चिरनेरकर, सृष्टी जयवंत ठाकूर, रुद्र राजेश पाटील आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.



## 'कोमसाप'चे पोपटी कविसंमेलन उत्साहात

### अंतर्मनातील भावनांतून साहित्याची निर्मिती -डॉ. गणेश मुळे




**पनवेल : वार्ताहर**

अंतर्मनातील भावनांतून साहित्याची निर्मिती होते, असे मत महाराष्ट्र शासनाच्या माहिती संचालनालयाचे कोकण विभागाचे उपसंचालक डॉ. गणेश मुळे यांनी व्यक्त केले. ते कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने आयोजित केलेल्या पोपटी कविसंमेलनाच्या उद्घाटनावेळी बोलत होते.

या कविसंमेलनास कोमसापचे जनसंपर्क प्रमुख, प्रा. एल. बी. पाटील, मुरूड शाखेचे अध्यक्ष संजय गुंजाळ, कर्जत शाखेचे अध्यक्ष ॲड. गोपाळ शेळके, मराठी भाषा मंडळ अधिकारी गजानन म्हात्रे, कोमसाप नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी व सामाजिक कार्यकर्ते विलास भगत उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. गणेश मुळे यांनी, मनातील भावना व्यक्त केल्या तर त्यातून नवसाहित्याची निर्मिती होऊ शकते. आज दुहेरी संवाद साधण्याची पद्धत नव्या माध्यमांमध्ये आली आहे. नवनवीन माध्यमांचे आव्हान आपल्यासमोर येत आहे. समाजामध्ये जोपर्यंत वाचणारा वर्ग आहे तोपर्यंत निश्चितच पुस्तके, वृत्तपत्र आणि साहित्य टिकेल, असा विश्वास व्यक्त केला. या वेळी व्यासपीठावरील इतर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

या कविसंमेलनामध्ये ज्योत्स्ना राजपूत, स्मिता गांधी, अमोल म्हात्रे, रामदास गायधने, मिलिंद खारपाटील, गुणवंत पाटील, चित्रलेखा जाधव, जनार्दन सताने, मारूती बागडे, प्रा. जयेश शिंदे, प्रा. अजिनाथ गाडेकर, शैलेश कोंडस्कर, प्रतिभा मंडले आदींनी वेगवेगळ्या विषयांवर आपल्या कविता सादर केल्या. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन योगिनी वैदू यांनी केले.

## कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल तालुका पत्रकार महासंघाच्या वतीने जागतिक महिला दिननिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते तसेच प्रत्येक यशस्वी स्त्रीमागेही एक पुरुष असायला हवा, असे प्रतिपादन ॲड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांनी केले.

नवीन पनवेल मधील के. आ. बांठिया विद्यालयाच्या सभागृहात आयोजित सन्मान सोहळ्याचे उद्घाटन स्वरसंस्कार संगीत विद्यालयाच्या संचालिका ॲड. सुरेखा प्रशांत भुजबळ यांच्या हस्ते झाले. या वेळी बांठीया विद्यालयाचे प्राचार्य भगवान माळी, पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, अध्यक्ष रत्नाकर पाटील उपस्थित होते.

या वेळी दिशा महिला मंचच्या अध्यक्ष नीलम आंधळे, सावित्रीबाई फुले महिला विकास मंडळाच्या अध्यक्ष नाझनिन पालेकर आणि भारत विकास परिषदेमार्फत अनेक उपक्रम राबविणाऱ्या ज्योती कानिटकर यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

दरम्यान, महासंघाचे अध्यक्ष रत्नाकर पाटील यांनी पनवेल तालुका पत्रकार महासंघातर्फे मागील दोन वर्षात केलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. या वेळी पत्रकार प्रदीप वालेकर, सुभाष वाघपंजे, छायाचित्रकार के. सी. सिंग, राजेश डांगळे, पत्रकार सनिप कलोते, राजू गाडे, दत्ता मोकल, दिपाली पारसकर, अनिल रॉय, शंकर वायदंडे, आशिष साबळे, गार्डन हेल्थ क्लबचे सर्जे राव पाटील, महिला मंडळाच्या सपना सोंडकर, आदिती गायकवाड, नूतन लिमण, पूजा वीर, रेखा शिंदे, अर्चना कोल्हे, बाला रावत, सुनिता शिंदे, माधूरी अडसुळे यांच्यासह महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.



## संपादकीय

# आपत्तीशी दोन हात

नित्यनेमे येणाऱ्या नैसर्गिक संकटांना निमूटपणे तोंड देण्याचे शेतकरी बांधवांना सवयीचे झालेले असते. कारण कृषी व्यवसाय हाच मुळात निसर्गाच्या लहरींवर अवलंबून असतो. म्हणूनच शेतकरी वर्गाला सरकारी पाठबळ मिळणे अनिवार्य ठरते. तशा प्रकारच्या सरकारी मदतीचा हात सध्या शेतकरी बांधवांसाठी अनिवार्य झाला आहे. हिवाळा संपून उन्हाळा सुरू होताना अवकाळी पावसाने आणि वादळवाऱ्याने शेतकऱ्यांना अक्षरश: खिंडीत गाठले आहे.

**गेल्या आठवड्याच्या अखेरीपासून राज्यातील आठ जिल्ह्यांना अवकाळीचा जबरदस्त तडाखा बसून तब्बल १३ हजार ७२९ हेक्टर जमिनीवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. गहू, ज्वारी, हरभरा, मका, द्राक्ष, आंबा, पपई आणि संत्रा अशी अनेक पिके अवकाळी पावसाने जमिनदोस्त केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे पंचनामे करण्याचे आदेश जारी तातडीने केले. होळीच्या दिवशी महाराष्ट्रात पुरणपोळीचा बेत घरोघरी पार पडत होता. धुळवडदेखील जोशात साजरी होत होती, तेव्हा महाराष्ट्रातील शेतकरी मात्र अवकाळीमुळे धुळधाण झालेल्या शेताकडे बघून आक्रोश करत होता. या शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी राज्य सरकारने धावून गेलेच पाहिजे ही अपेक्षा चुकीची म्हणता येणार नाही. अवकाळीच्या मुद्द्यावर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली हेदेखील योग्यच झाले. विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या मुंबईत सुरू आहे आणि अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातच अवकाळी पावसाचा मुद्दा उपस्थित झाला आहे. विरोधी पक्षांनी बुधवारी सभागृहामध्ये शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी आक्रमक मागणी केली. वास्तविक तशाप्रकारची मदत मिळायलाच हवी याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. किंबहुना, शिंदे–फडणवीस सरकारचीदेखील तीच इच्छा आहे, म्हणूनच नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. महाविकास आघाडी सरकारच्या काळात घोषणा वारेमाप झाल्या, परंतु शेतकऱ्यांच्या हाताला छदामदेखील लागला नाही. सगळा बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी असा प्रकार होता. शिंदे–फडणवीस सरकारचा हेतू शुद्ध असून शेतकऱ्यांच्या मदतीच्या प्रश्नी तरी विरोधकांनी राजकारण करू नये, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले ते एवढ्यासाठीच. कुरघोडीच्या राजकारणात शेतकऱ्यांना मदत मिळणे दूरच राहते असा आजवरचा अनुभव आहे. अवकाळी पावसामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे किती मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे याची माहिती खुद्द फडणवीस यांनीच सभागृहाला दिली. या माहितीनुसार पालघर जिल्ह्यातील विक्रमगड, जव्हार तालुक्यात आंबा आणि काजूचे नुकसान झाले आहे. तर सर्वाधिक फटका नाशिक, धुळे, नंदुरबार आणि अहमदनगर या जिल्ह्यांना बसला आहे. सरकारची भूमिका शेतकरी बांधवांना मदत करण्याचीच आहे, असे वारंवार सांगूनही विरोधी पक्षाच्या आमदारांनी सभागृहात गोंधळ घातला. खरे तर अशा गोंधळाची काहीही आवश्यकता नव्हती. त्याऐवजी अवकाळी पावसाबाबत योग्य पद्धतीने चर्चा घडून आली असती तर बरे झाले असते. स्थानिक पातळीवरील शेतकऱ्यांची नेमकी अवस्था तेथील आमदारांना पटवून देता आली असती. ज्या शेतकऱ्यांनी आपापल्या शेतात आक्रोश सुरू केला आहे, त्यांचा आवाज सभागृहापर्यंत पोहचवणे शक्य झाले असते, परंतु एवढी प्रगल्भता विरोधीपक्षांकडून अपेक्षिणे निरर्थक ठरावे. शिंदे–फडणवीस सरकार हाच शेतकरी बांधवांसाठी आपत्कालीन सुटकेचा मार्ग आहे हे ध्यानात ठेवलेले बरे. कारण हे सरकार खऱ्या अर्थाने जनतेचे आहे व तेच अवकाळी संकटातून अचूक मार्ग काढेल, असा विश्वास वाटतो.**

# गाळसफाईसाठी पोलादपूर तालुक्याला निधी आवश्यक





**खबरबात**
**शैलेश पालकर**

सार्वजनिक बांधकाम विभागाने २००५ नंतर पोलादपूर तालुक्यातील वाळू ही बांधकामास उपयुक्त नसल्याचे जाहीर केल्यानंतर या तालुक्यातील वाळू ही वाळू अथवा रेती नसून केवळ गाळ असल्याचे निश्चित झाले, मात्र या गाळाचा उपसा करून रेती अथवा वाळूच्या दराने विकून अनेक बांधकाम सामुग्री पुरवठादार म्हणजेच बिल्डींग मटेरियल सप्लायर्स कोट्यधीश झाले आहेत. शासनाने पोलादपूर आणि महाड तालुक्यातील मुख्य नद्या आणि त्यांच्या उपनद्यांच्या पात्रातील वाळू उपसा करणाऱ्यांना गाळ उपसा करणारे म्हणून जाहिर करून गेल्या वर्षभरापासून गाळ उपसा करणाऱ्यांकडून रेतीची म्हणजेच गौणखनिज उत्खननाची रॉयल्टी घेण्याऐवजी त्यांना नदीपात्रातील गाळ उपसा करीत असल्याबद्दल मजूरी देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील नद्या भौगोलिक परिस्थितीमुळे तीव्र उताराच्या ठिकाणी असल्याने नद्यांची पात्रं दूतर्फा मोठ्या प्रमाणात किनाऱ्यांची झीज करीत असल्याने याद्वारे निर्माण होणारा गाळ सोबत घेऊन वाहात असतात. परंतू, पावसाची तीव्रता कमी झाली की हे प्रवाह या सोबत आलेल्या गाळामुळे लुप्त होऊन केवळ दगड–गोट्यांनी भरलेल्या पात्राद्वारे नदीचे अस्तित्व शिल्लक राहते. या उथळ पात्रांमुळे पावसाळयात जशी पूरस्थिती दरवर्षी उद्भवत आहे; त्याचप्रमाणे उन्हाळयात अनेक गावांलगत नदीचे पात्र असूनही तीव्र पाणीटंचाईची झळ ग्रामस्थांना सहन करावी लागत आहे, यामुळे या नद्यांच्या पात्रांची गाळसफाई करण्याची गरज पाणीटंचाई अन् पूरस्थिती निवारणाच्या दुहेरी हेतूने निर्माण झाली आहे.

तालुक्यातील ढवळी, कामथी, चोळई, घोडवनी आणि सावित्री या पाच प्रमुख नद्या तीव्र उताराच्या असल्याने सर्वच नद्यांच्या खोऱ्यांमध्ये दगड,रेजगा आणि रेती अशी नैसर्गिक साधनसामग्री मोठ्या प्रमाणात दरवर्षी जमा होत असते. याखेरिज अन्य जोडनद्या आणि उपनद्यांची पात्रंही अशाच प्रकारे मुबलक प्रमाणात रेजगा, दगड–गोटे आणि रेतीसह भरलेली आहेत. २५ जुलै २००५ च्या अतिवृष्टीवेळी मोठ्या प्रमाणात सर्वच नद्या आणि उपनद्यांमध्ये गाळ जमा झाला. यामध्ये झाडे, झुडुपे आणि फांद्यांचाही समावेश होता. अनेक ठिकाणी नदीकिनाऱ्यालगतच्या जमिनींचीही धूप होऊन शेतकऱ्यांचे उपजिविकेचे साधन गेले. पोलादपूरच्या रवींद्र चित्रेंचे घर आणि परिसरातील सुमारे एक एकर क्षेत्रातील जमीन तसेच देवळे येथील नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक विद्यालयाच्या क्रीडांगणासाठी वापरण्यात येणारी जमीनही वाहून गेल्याने तेथे दगड–गोटयांचे रण माजले. याखेरिज, तालुक्यात अनेक ठिकाणी नद्यांच्या प्रवाहामुळे भूस्खलन झाल्याच्या घटना दिसून आल्या. नद्यांची दगड–गोट्यांनी भरलेली पात्रं उथळ झाल्याने दरवर्षी अतिवृष्टीवेळी अल्पावधीत नदीला पूर येऊन पात्र दूतर्फा भरून वाहू लागल्याची दृश्यं दिसू लागली आहेत. यामुळे नदीकिनाऱ्यालगतच्या घरांतील ग्रामस्थांना पुरेसा अवधी नसल्याने चीजवस्तू घेऊन स्थलांतर करता न आल्याने मालमत्तेचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिसून आले आहे.

अनेकांनी नदीकिनारी केलेल्या बागा आणि मळयांची मातीही वाहून गेल्याने तेथे शेतकऱ्यांची कधीही भरून न येण्यासारखी हानी झाली आहे. सातबाराच्या उताऱ्यावरील क्षेत्र प्रत्यक्षात तेथे अस्तित्वात नसल्याचेही भूमापनावेळी दिसून आले आहे. नद्यांच्या पात्रातील दगड–गोटयांचा गाळ दरवर्षी उपसण्यासाठी सरकारमार्फत प्रयत्न होण्याची आवश्यकता लक्षात घेऊन तत्कालीन तहसिलदार सुरेश कारंजकर यांनी तत्कालीन प्रांताधिकारी डॉ. शिवाजीराव पाटील यांच्याकडे या नद्यांच्या पात्रातील गाळसफाईबाबत अहवाल पाठविला होता. यानुसार पुर्वीच्या मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७च्या साईडपट्टयांचे रूंदीकरण करताना मोठया प्रमाणात दगड–गोटयांचा वापर केला गेला. अलिकडेही कापडे–कामथे रस्त्याच्या पुलांच्या ॲप्रोचरोडच्या भरावासाठीही घोडवनी व कामथी नदीच्या पात्रांतील दगड–गोट्यांचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात आला आहे, मात्र हे गाळउपशाचे प्रमाण अत्यंत नगण्य असल्याने आगामी पावसाळयात नद्यांची पात्रं दूथडी भरून वाहताना लोकवस्तीत पूरस्थिती निर्माण करण्यास कारणीभूत ठरणार आहेत. ही पात्रं तातडीने गाळउपसा करून मोकळी केली गेल्यास लोकवस्त्यांना होणारा पूराचा धोका टळणार असल्याने शासकीय पातळीवर यासाठी प्रयत्न होण्याची गरज निर्माण झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात अनेक वर्षांपासून नद्यांच्या पात्रांतील दगड–गोट्यांच्या रणामध्ये मोठे मोठे साधारणत: तीन ते साडेचार हात व्यासाचे आणि एक ते दीड हात खोल असे खड्डे खणून त्यात दिवसभर जमा होणारे पाणी रात्री अथवा सकाळी पहाटे उपसण्याचा ग्रामीण पाणीटंचाईवरील पारंपरिक उपाय अस्तित्वात आहे. लहान मुले, मुली, तरूणी आणि वृध्द महिला तर तुरळक प्रमाणात पुरूषही याप्रकारचे खड्डे म्हणजेच डवऱ्या खणण्यासाठी मेहनत घेताना दिसतात. या नद्यांच्या पात्रांतील अनेक डोह गाळाने भरल्यामुळे उन्हाळयात नद्यांमध्ये अनेक ठिकाणी पाण्याचा लवलेशही दिसत नाही. पोलादपूर शहरातील हत्तीडोहामध्ये हत्ती बुडाल्याची दंतकथा सांगितली जात होती तेथे आता कंबरभर पाणीही नसल्याची वस्तुस्थिती दंतकथेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत असल्याने पाणी साठवून ठेवण्याची नद्यांच्या पात्रांची क्षमता गाळउपसा न झाल्याने संपुष्टात आल्याचे दिसून येत आहे.

पोलादपूर तालुक्यातील पाणीटंचाई ग्रस्त गांवाना टँकरमुक्त करण्यासाठी येत्या काही वर्षांत निविदा काढून नद्यांतील गाळउपसा करण्याची आवश्यकता असून यामुळे पूरस्थिती आणि पाणीटंचाई या दोन्ही परस्परविरोधी पाणीसमस्यांचे निवारण शक्य होणार असल्याचे जलतज्ज्ञांचे मत आहे.

पोलादपूर तालुक्यातील सवाद ग्रामपंचायतीने दगड गोटे उपसा करण्याकामी ग्रामसभेचा ठराव करून विशेष परवानगी प्राप्त केली असल्याने अन्य ग्रामपंचायतींनीही हद्दीतील नदीपात्रांतील गाळउपसा करण्यासाठी ग्रामसभेच्या ठरावाद्वारे उपविभागीय कार्यालयामार्फत रितसर परवानगी घेतल्यास अतिवृष्टी व महापूर काळात नद्यांच्या पात्राची दिशा बदलण्याचे प्रकार कमी होऊन नुकसानीचे प्रमाणही घटणार आहे. 'एमआरईजीएस'मध्ये पहिल्याच मुद्दयात नदीपात्रांतील गाळउपसा अशा शिर्षकाखाली याकामी निधी उपलब्ध करण्याची मागणी करता येत असूनही गेल्या काही वर्षांपासून याकामी कोणत्याही निर्णयक्षम विभागामार्फत निधीची मागणी करण्यात आली नसल्याने तालुक्यातील पाचही प्रमुख नद्यांच्या पात्रांमध्ये दगड गोटयांचा गाळ प्रचंड प्रमाणात साठून नद्यांच्या पात्रांची दिशा बदलत आहे. नद्यांच्या पाण्याचा प्रवाह बदलल्यामुळे पात्रालगतच्या शेतांचे तसेच जॅकवेल आणि अन्य प्रकारच्या जमिनींचे मोठ्या प्रमाणात उत्खनन झालेले दिसून येत असूनही याकामी 'एमआरईजीएस' मधून कोणत्याही प्रकारच्या निधीची मागणी करण्यात आली नाही.

महाडच्या उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी महाड आणि पोलादपूर तालुक्यांचा सुधारित आपत्ती सौम्यीकरण आराखडा रायगड जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्यसरकारला देण्यात आल्याची माहिती देत सावित्री आणि तिच्या उपनद्यांमधील गाळ उपसा काढण्याच्या कामासाठी ३१ कोटी रूपयांच्या निधीपैकी पहिला पाच कोटी रूपयांचा हप्ता लवकरच उपलब्ध होईल, अशी माहिती देऊन गाळउपसा कामाच्या मोबदल्याबद्दल जी उपलब्धता दर्शविली ती पाहता पोलादपूर तालुक्यातील सावित्री नदीसह अन्य नद्यांतील गाळ उपसा करणाऱ्यांना रेती अथवा वाळू उपशाची रॉयल्टी भरण्यास भाग पाडण्यापेक्षा गाळउपशाची मजूरी देण्याची गरज आहे. यानंतर जर कोणी गाळ उपसा करून बांधकाम सामुग्री म्हणून विक्री करताना आढळल्यास सर्वसामान्यांच्या घरांच्या इमारतींना कमकुवत व निकृष्ट दर्जाचा वाळू पुरवठा केल्याबद्दल अशाविरूध्द कारवाई करून संबंधित इमारत बांधणाऱ्यांना मोबदला देण्याची गरज आहे.

## बदलते तंत्रज्ञान

### बीएसएनएल लवकरच लॉन्च करणार ४जी सर्व्हिस

बीएसएनएल ही भारतातील सरकारी टेलिकॉम कंपनी आहे. ही कंपनी आपल्या ग्राहकांसाठी नवनवीन रिचार्ज प्लॅन्स लॉन्च करत असते. बीएसएनएल ग्राहकांसाठी आनंदाची बातमी आहे. मात्र आता बीएसएनएल कंपनी आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन सर्व्हिस लॉन्च करणार आहे.





भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) लवकरच भारतात ४जी सर्व्हिस लॉन्च करणार आहे. बीएसएनएलने पुढील महिन्यात म्हणजेच एप्रिल महिन्यामध्ये कमर्शिअल ४जी सेवा सुरु करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. यासाठी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)कडून काही उपकरणे खरेदी करत आहे. मागील महिन्यामध्ये कंपनीने टीसीएस कन्सोर्टियमकडून उपकरणांसाठी तब्बल २४,५०० कोटींचा कर्ररला मंजुरी दिली आहे.

माध्यमांच्या माहितीनुसार बीएसएनएल कंपनी २०० साईट्ससाठी उपकरणे प्री–ऑर्डर करत आहे. ज्याचा सध्या सुरुवातीला वापर हा पंजाब राज्यामध्ये केला जाणार आहे. सुरुवातीला पंजाबच्या फिरोजपूर, अमृतसर आणि पठाणकोट या तीन जिल्ह्यांमध्ये ४ जी सेवा लॉन्च केली जाणार आहे. ४जी सेवा लॉन्च करण्यासाठी बीएसएनएलच्या पायलट प्रोजेक्टचा हा एक भाग आहे. अजून टीसीएसच्या अंतिम निविदेला सरकारची मंजुरी मिळणे बाकी आहे. टीसीएसला १ लाख ४ साईट्ससाठी मार्च महिन्याच्या शेवट्पर्यंत सरकारची मान्यता मिळू शकते. कंपनी पंजाबमधून या सेवांसाठी टेस्टिंग सुरू करणार आहे.

टीसीएसच्या मालकीच्या तेजस नेटवर्कने आधीच सुमारे ५० साईटसाठी उपकरणे पुरविली आहेत. ज्यासाठी उ–ऊजढ (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलिमॅटिक्स) सॉफ्टवेअर पॅच अपग्रेड तैनात केले जाऊ शकते. सरकारी अधिकाऱ्यांच्या मतानुसार, मार्चच्या मध्यापर्यंत ४जी लॉन्च होण्यासाठी सुमारे १०० साईट्स तयार असण्याची अपेक्षा आहे. जर का सर्व गोष्टी प्लॅननुसार झाल्या तर, बीएसएनएल आपली ४जी सेवा एप्रिल महिन्यात लॉन्च करू शकते.

बीएसएनएलने भारतात ४जी सर्व्हिस लॉन्च केल्यानंतर त्याच्या फायद्यामध्ये २० टक्क्यांनी वाढ होण्याची अपेक्षा आहे. केंद्रीय राज्यमंत्री देवुसिंह चौहान म्हणाले की, याच्या अंमलबजावणीमुळे बीएसएनएलला २०२६–२०२७ या आर्थिक वर्षापासून फायदा होण्यास सुरुवात होईल.

# जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज



**निमित्त**

श्रीरामाने शरयू नदीत देह समर्पित केला, तर श्रीकृष्णाने पारध्याचा बाण लागल्यानंतर तोही सदेह अनंतात विलीन झाला. सदेह वातावरणात म्हणजेच पंचमहाभूतांत गेलेले हे दोन्ही अवतार होते; परंतु, मानव असूनही सदेह वैकुंठगमनाचे सामर्थ्य दर्शवणारे संत तुकाराम महाराज हे एकमेव होते. तुकाराम बीजनिमित्त त्यांच्या कार्याचा घेतलेला थोडक्यात आढावा.

ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस... वारकरी संत परंपरेचा कळसाध्याय ठरलेले संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचे आज तुकाराम बीज आहे. म्हणजेच फाल्गुन वद्य द्वितीया या दिवशी तुकाराम महाराजांनी सदेह वैकुंठगमन केले. संत तुकाराम महाराज सतराव्या शतकातील सामाजिक प्रबोधनाची मुहूर्तमेढ रोवणारे निर्भीड कवी होते. समाजाच्या तळागाळातील लोकांनाही सहज उमजतील, अशा संतरचना तुकारामांनी केल्या.

संत तुकाराम (ऊर्फ तुकोबा) हे सतराव्या शतकातील एक वारकरी संत होते. त्यांचा जन्म माघ शुद्ध वसंत पंचमीला झाला. पंढरपूरचा विठ्ठल वा विठोबा हे तुकारामांचे आराध्यदैवत होते. तुकोबा एका सुखवस्तू घरात जन्माला आले. त्यांची वंशकुळी मोरे आणि आडनाव अंबिले. तीन भावांमध्ये तुकोबा मधले. थोरला भाऊ थोडासा विरक्त. घर–प्रपंच व्यवस्थित चाललेला असताना या कुटुंबावर एकामागोमाग एक आपत्ती कोसळू लागल्या. आईवडील गेले, थोरल्याची बायको गेली, तुकोबांची नेहमी आजारी असणारी पहिली पत्नी रखमाबाईही गेली. सुस्थितीत असणाऱ्या तुकोबांवर कर्जबाजारी होण्याचा प्रसंग आला. अशा अपघातात सर्वसामान्य माणसे खचून जातात, तुकोबांच्या थोरल्या भावाप्रमाणे घर–संसार सोडून निघून जातात किंवा वैतागून देहत्यागही करतात. इथेच तुकोबांचे थोरपण आहे. तुकोबा हरिचिंतनात निमग्न झाले. आपल्याला झालेल्या जगरहाटीचे दर्शन त्यांनी आपल्या अभंगानुभवातून शब्दबद्ध केले. भगवद्भक्तीची पताका खांद्यावर घेऊन आसमंतात जनजागृतीचे वादळ निर्माण केले.

तुकोबांचे अभंग वाचणारा प्रत्येकजण या वादळाने झपाटला जातो. तुकोबा वामनाप्रमाणे सारी भूमी पादाक्रांत करतात आणि आकाशालाही गवसणी घालतात. सागराचा ठाव घेणारी आणि हिमालयाच्या उंचीला स्पर्श करणारी अशी तुकोबांची लोकोत्तर प्रतिभा आहे. चारचौघांप्रमाणे सामान्य जीवन वाट्याला आलेले असूनही तुकोबांनी आपत्तींनी घेरलेल्या जगण्यातील वेगळा अर्थ सर्वांना समजावून सांगितला. व्यवहाराची थोर शिकवण शब्दाशब्दांतून देत असतानाच भक्तीचे सहस्यही उलगडून दाखविले. संसारात वावरत असताना येणाऱ्या सुख–दुःखांना काही अंतरावर कसे ठेवावे, गुंतून न राहताही संसार कसा करता येतो त्याचे मार्गदर्शन तुकोबांसारखे दुसऱ्या कोणी केलेले नाही.

तुकाराम महाराज हे साक्षात्कारी व निर्भीड संत कवी होते. विशिष्ट वर्गाची पारंपरिक मक्तेदारी असलेला वेदार्थ तुकोबांच्या अभंगवाणीतून सामान्य जनांपर्यंत प्रवाहित झाला. संत तुकारामांचे अभंग महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे महान द्योतक आहेत. वारकरी, ईश्वरभक्त, साहित्यिक, अभ्यासक व सामान्य रसिक आजही त्यांच्या अभंगांचा अभ्यास करतात. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगलेखनाबरोबरच गवळणीही रचल्या.

संत तुकाराम गाथा म्हणजे बहुजनांची गीता आहे. ज्ञानोबा आणि तुकाराम म्हणजे महाराष्ट्राची संस्कृतिक विद्यापीठे आहेत. त्यांचे साहित्य म्हणजे आध्यात्मिक ज्ञानाचा आधारवड आहे. ज्ञानेश्वरानंतर जनार्दन स्वामी, एकनाथ महाराज, नामदेव आणि त्यानंतर संत तुकाराम यांनी भागवत धर्माची पताका सर्वत्र फडकवली. संघर्षमय जीवन जगूनही अध्यात्म, भागवत भक्ती, उपदेशाची कास न सोडणाऱ्या तुकारामांनी फाल्गुन वद्य द्वितीयेला सदेह वैकुंठगमन केले.

**(साभार : वेबसाईट)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : वीकएण्डला जोडून होळी, धुळवडीच्या सुट्ट्या आल्याने अनेकांनी आपल्या कुटूंबासह समुद्रकिनारी फिरण्याचा आनंद घेतला. माणकेश्वर बीच येथील हे दृष्य टिपले आहे प्रवीण गायकर यांनी.**

## आरोग्य प्रहर

### गाजराच्या ज्यूसमुळे मिळतात जबरदस्त फायदे

गाजरामध्ये भरपूर जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट असतात, जे शरीर निरोगी ठेवण्यासाठी एकत्र काम करतात. हे रोज खाल्ल्याने कॅलरीजही वाढत नाहीत. गाजरात अ, क आणि के जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामध्ये



ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन नावाचे कॅरोटीनॉइड पिगमेंट्स देखील असतात, जे शरीरातील मुक्त रॅडिकल्सशी लढण्यास मदत करतात. गाजर आपली रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासही उपयुक्त आहे.

**डोळ्यांसाठी फायदेशीर :** गाजरात अनेक आवश्यक पोषक घटक असल्याने ते डोळ्यांसाठी खूप फायदेशीर मानले जाते. गाजराच्या रसामध्ये व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळते, जे आपल्या डोळ्यांसाठी आवश्यक आहे. त्यात ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन देखील आढळते, जे हानिकारक प्रकाशापासून डोळ्यांचे संरक्षण करते. गाजराचा रस प्यायल्याने 'मॅक्युलर डिजनरेशन' या वयाशी संबंधित आजाराचा धोका कमी होतो आणि डोळ्यांशी संबंधित इतर समस्यांची शक्यताही कमी होते.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त :** भाज्या असोत किंवा भाज्यांचा रस, हे दोन्ही आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर मानले जातात. गाजराच्या रसामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट असतात, जे प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आणि मुक्त रॅडिकल्समुळे होणारे नुकसान टाळण्याचे काम करतात.

**रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवते :** मधुमेह असलेल्या रुग्णांनी कमी–ग्लायसेमिक निर्देशांक असलेले अन्न खाणे आवश्यक आहे. कारण ते रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यात मदत करतात. गाजराच्या रसामध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स असतो. यामुळेच मधुमेही रुग्णांसाठी हा एक चांगला पर्याय आहे.

**त्वचेसाठी फायदेशीर :** गाजराच्या रसात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. व्हिटॅमिन सी हे आपल्या त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. व्हिटॅमिन सी त्वचेला फ्री रॅडिकल्सच्या नुकसानीपासून वाचवते. गाजराच्या रसामध्ये कॅरोटीनोइड्स आढळतात, जे त्वचेला अतिनील हानीपासून वाचवण्याचे काम करतात.

**यकृतासाठी फायदेशीर :** गाजराच्या रसामध्ये असलेले कॅरोटीनोइड्स त्यांच्या अँटीऑक्सिडंट आणि दाहक–विरोधी गुणधर्मांसाठी ओळखले जातात. हे नॉन–अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज पासून यकृताचे संरक्षण करण्यास मदत करते.

# रोहा सानेगाव रस्त्यालगत आढळला महिलेचा मृतदेह

## तालुक्यात खळबळ; पोलीस तपास सुरू



**रोहा, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा अलिबाग मौजे वावेपोडगे हद्दीमध्ये एक युवतीचा खून झाल्याची घटना समोर आल्याने रोहा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना दगड कॉरिजवळ जंगल भागात घडली आहे.या मृत युवतीचे वय २५ ते ३० वर्षे, उंची पाच पाच इंच, अंगात लाल रंगाचा कुर्ता (टॉप) त्यावर चौकटी आकाराची नक्षी, काळ्या रंगाची लेगीज, गळ्याभोवती काळ्या रंगाची ओढणी त्यावर सफेद रंगाची स्टार नक्षी अशा वर्णनाचे मृत युवतीचा मृतदेह आढळून आला आहे. तर प्राथमिक अंदाजानुसार या युवतीला ओढणीने गळा आवळून मारल्याचे दिसून येत आहे. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुर्यवंशी, रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर व पोलीस पथक यांनी घटनास्थळी भेट दिली.


फिर्यादी पोना . १५६० मनीषा दिनानाथ ठाकुर रोहा पोलीस ठाणे यांनी ७/३/२०२३ रोजी रात्री साडे अकरा वाजता गुन्हे रजिस्टर न. ३५/ २०२३ भारतीय दंड विधान कायदा कलम ३०२ प्रमाणे अनोळखी इसमाविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंद केला आहे. तर पुढील तपास रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. मनीष ठाकूर हे करीत आहेत.

# ऐन शिमगोत्सवात काजूगर स्वस्त

**माणगाव : प्रतिनिधी**

ऐन शिमगोत्सवात काजूगर स्वस्त झाल्याने खवय्यांनी समाधान व्यक्त केले आहे. माणगाव तालुक्यातील बाजारपेठेत काजू गराची आवक वाढल्याने महाग मिळणारे काजू गराना स्वस्ताई आली आहे.

रानमेव्यासाठी प्रसिद्ध असलेली माणगाव तालुक्यातील बाजारपेठ ओल्या काजूच्या विक्रीचे एक केंद्र बनत आहे. आजूबाजूच्या डोंगरातील वस्तीवरून विक्रीस येणाऱ्या आदिवासी महिलांना रोजीरोटीचे चांगले साधन यानिमित्ताने उपलब्ध झाले आहे.शेकडा १५० रुपये ते २०० रुपयांना मिळणारे काजूगर गेल्या काही दिवसांत आवक वाढल्याने स्वस्त झाले असून या दिवसात शेकडा. १०० ते १२० रुपयांना मिळत आहेत. यामुळे काही दिवसापूर्वी शेकडा २०० रुपयांना काजूगर मिळत होते मात्र गेल्या काही दिवसांत आवक वाढली असल्याने खवय्ये व पर्यटकांनी काजू खरेदी करण्याकडे पसंती दिली असून ऐन सणासुदीत काजूगर स्वस्त झाल्याने खवय्यांनी आनंद व्यक्त केला आहे.



**या दिवसात मिळणारे काजूगर अत्यंत चविष्ट असतात. खास गावावरून दरवर्षी आम्ही हमखास काजूगर नेतो, मागवितो. आता हंगाम सुरू झाला असून काजू गर स्वस्त झाले आहेत.**

**–बाळाराम मांडवकर, काजूगर ग्राहक**

**गेल्या काही दिवसांत सुरुवातीला काजूगर काहीसे महाग होते. आता रानातून बऱ्यापैकी काजूगर मिळू लागले आहेत त्यामुळे थोडे स्वस्त झाले आहेत. काही दिवसांपासून १५० ते २०० रुपयांना विकले जाणारे काजूगर १२० रुपयांपासून पुढे विकले जात आहेत.**

**–मंजुळा जाधव, काजूगर विक्रेता**

# कर्जतमधील रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ३७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केले हे ४७२ वे रक्तदान शिबिर होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/Tender-01/ 2023-24 Dtd. 06.03.2023 **RFx No. 7000026430** | **Sub:** Invitation of SRM E-Tender for the work of providing Housekeeping Services in the Premises of EHV (O&M) Dn. Office Mahad, 220KV Mahad SS Control Room & Staff Quarters Colony, 220 KV Kandalgaon SS & Staff Quarters Colony, 220 KV Vile Bhagad S/s, 100 KV Roha SS & Colony, 100 KV Mhasla SS & Colony & KTL Sub-Division Office Premises under EHV (O&M) Division, Mahad for the year 2023-24. | Up to Rs. 9,10,544/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is higher
**Tender Fee**: Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission is From:** 06.03.2023 @ 00:00 Hrs to 12.03.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**

# रोहा शहरात रस्त्याच्या कामामुळे उडतेय धूळ

रोहे : प्रतिनिधी

मुरुड रोहा कोलाड मार्गाचे काम रोहा शहरात चालू आहे. या कामाच्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या साईड पट्टीवर माती टाकल्याने मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. दुसरीकडे या रस्त्याच्या मधोमध दुभाजकासाठी सोडलेल्या जागेवर मातीची कच टाकल्याने याचीही धूळ उडत आहे. तीन महिने मोठ्या प्रमाणात शहरात रस्त्यावरून धूळ उडत असल्याने नागरिकांचे व रस्त्याच्या बाजूला असलेल्या व्यापाऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

रस्ता काम लवकर पूर्ण करून रस्त्याच्या बाजूला असलेल्या साईट पट्टीवर सिमेंट अथवा डांबर टाकण्याची मागणी नागरिक करत आहेत. त्यामुळे साईड पट्टीवरील धूळ उडणार नाही. चार महिने शहरातील मुरुड रोहा कोलाड या राज्य मार्गाचे कॉंक्रीट करण्याचे काम सुरू आहे.

## ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जानेवारी २०२३**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | संदेश गोपाळ ढवळे | सुरेंद्र ए. काकडे | पवल१–२२४३ २०१४ | २/५/२०१४ | सदनिका क्र.२, तळ मजला, नंदकिशोर को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| २ | रेखा गणेश पदरत | मनिषा मोरेश्वर घरत | पवल२–२७७०– २०१८ | १/३/२०१८ | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, बि.क्र. १/अ, साईकृपा को. हौ. सो. मौजे पालीदेवद |
| ३ | उत्तम दादू पवार, रिया उत्तम पवार | प्रकाश बद्री यादव, प्रमिला प्रकाश यादव | पवल ३– १७९४ – २०२२ | २/२/२०२२ | सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, साईकृपा को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर |
| ४ | मयूर बाळू गवाणे | केलाश वनाभाउ फदाले | पवल३–२०५९२ –२०२२ | ७/१२/२०२२ | सदनिका क्र. बी १०३, पहिला मजला, बी विंग, साक्षी पार्क टाईप १ को. हौ.सो. मौजे पालीदेवद |
| ५ | दिपा सुंदर अमीन, सुंदरा सोमा अमीन,धीरज सुंदरा अमीन | मुनीरा शब्बीर इलेक्ट्रीकवाला | पवल१–१२– २०२३ | २/१/२०२३ | सदनिका क्र. २८०५, २८ वा मजला, जे विंग, जरना को. हौ.सो., बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ६ | भावेश भालचंद्र पवार, मेघना भावेश पवार | शंकर रामचंद्र पुजारी | पवल३–१०९०५ | २३/०६/ २०२२ | सदनिका क्र. ०१, तळ मजला, बि.नं. ३, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स को. हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ७ | वैशाली बाळासाहेब कदम | विष्णू बाळकृष्ण मंचेकर | पवल३–२१४– २०२३ | ४/१/२०२३ | सदनिका क्र. २०८, दुसरा मजला, बि.नं. ए, ओंकार स्वरुप को. हौ.सो., मौजे पालीदेवद. |
| ८ | अमोल एकनाथ लाड, गौरी अमोल लाड | सचिन धर्मराज चोगले | पवल४–१२२– २०२३ | ४/१/२०२३ | सदनिका क्र. ई २०२, दुसरा मजला, बि.नं. २, विठोबा कॉम्प्लेक्स को. हौ.सो., मौजे पालीदेवद |
| ९ | गणेश विलास जाधव, पूजा गणेश जाधव | आंचल संदिप बहेती | पवल १–८३७९ २०२२ | १२/७/२०२२ | सदनिका क्र. के २२०५, २२ वा मजला, के विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १० | वैभव अरुण केदारी, वनश्री प्रकाश | प्रभाकर बळीराम चव्हाण, राहुल प्रभाकर चव्हाण | पवल २–९४५० –२०२२ | १/७/२०२२ | रो हाउस नं. २३, विघ्नहर्ता इन्क्लेव्ह को.हौ.सो., शिलोत्तर रायचूर. |
| ११ | रामचंद्र उत्तम पवार, प्रणाली रामचंद्र पवार | वामन नाना करपे | पवल५–७१६– २०२३ | १२/१/२०२३ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, श्रीमाता अपार्टमेंट को.हौ.सो., मौजे पालीदेवद. |
| १२ | अमरजी प्रद्युम्नप्रसाद बरनवाल, रिंकीदेवी अमरजीत | मे. माउलीप्रसाद कन्स्ट्रक्शन कं. तर्फे सौ. श्यामल चंद्रकांत पोपेटा | पवल २–१६६६– २०२२ | ३/२/२०२२ | सदनिका क्र. ४०१, चौथा मजला, दत्त दर्शन, मौजे शिलोत्तर. |
| १३ | बाबू एस. मंडल | मे. माउलीप्रसाद कन्स्ट्रक्शन कं. तर्फे सौ. श्यामल चंद्रकांत पोपेटा | पवल४–१२९८४– २०२१ | ३०/११/२०२१ | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला,दत्त दर्शन, मौजे शिलोत्तर रायचुर. |
| १४ | निता शरद वाघमारे, शरद बबनराव वाघमारे | कासीम मोहम्मद नमकवाला | पवल २–१३७८०– २०२२ | ३/१०/२०२२ | सदनिका क्र. ३०५, तिसरा मजला, इम्पेरियल, बी विंग, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १५ | सिंधू राजकुमार कारंडे | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे प्रो. प्रा विनय अग्रवाल तर्फे कु.मु. संदिप रमेश केणी | पवल १–९५३३– २०२१ | १८/१०/ २०२१ | सदनिका क्र. जे ०६०७, सहावा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर. |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

## ग्रामपंचायत पालीदेवद
## ता. पनवेल, जि. रायगड
**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहीतील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**फेब्रुवारी २०२३**

| अ. क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक | मालमत्ता वर्णन |
|---|---|---|---|---|---|
| १ | रोहिणी ब्रिदजीट स्टॅनली | एम.के. मोहनन | पवल ५– २०७८४– २०२२ | २७/१२/२०२२ | सदनिका क्र. बी. २०४, दुसरा मजला श्री गणेश भावना को. हौ.सो. लि., पालीदेवद. |
| २ | किशनकुमार रमेशचंद्र वर्मा, रवीकुमार रमेशचंद्र वर्मा भानुमती रमेशचंद्र वर्मा | पूर्णानंद जनार्दन कोळी, ज्ञानेश्वर जनार्दन कोळी | पवल ३–५४८– २०२३ | ९/१/२०२३ | सदनिका क्र. २१, दुसरा मजला, बि.नं. जी ८, यमुना को. हौ.सो. लि. शिलोत्तर रायचूर. |
| ३ | राजेंद्र नारायण कपिलेश्वरी, नेहा राजेंद्र कपिलेश्वरी | नरसिंह कामत | पवल ४– ५७९६ – २०२० | २२/१०/२०२० | सदनिका क्र. एफ १०३, पहिला मजला, एफ विंग, गंगाधाम बि.नं. १, को. हौ.सो. लि. पालीदेवद. |
| ४ | शंकर प्रकाश लाड, प्रियांका प्रकाश लाड | प्रमोद रामदास शेळके, सुनंदा प्रकाश शेळके(२ रे मालक) नरेश आर. घाटे, नंदा नरेश घाटे(२ | पवल ५–२०८९९ – २०२२ | २९/१२/२०२२ | सदनिका क्र. १०४, पहिला मजला, आय विंग, बि.नं. ४, साई इन्क्लेव्ह को. हौ.सो. लि. शिलोत्तर रायचूर |
| ५ | मंगेश शांताराम मर्गज | रमेश शांताराम मर्गज | पवल ३–१००१– २०२३ | १७/०१/२०२३ | सदनिका क्र. डी १०२, पहिला मजला, बि.नं. एफ, ओम शिवा कॉम्प्लेक्स को. हौ.सो.लि. पालीदेवद. |
| ६ | उषा मधुकर जाधव यांचे कायदेशीर वारस स्मिता मधुकर जाधव | उषा मधुकर जाधव यांचे कायदेशीर वारस श्रीकांत मधुकर जाधव | पवल२–१०५२ –२०२३ | १९/०१/२०२३ | सदनिका क्र. सी १०४, पहिला मजला, टाईप २ साक्षी पार्क को.हौ.सो.लि. पालीदेवद. |
| ७ | शिवाजी यशवंत गायकवाड, मयुरी शिवाजी गायकवाड | अनिल भगवान बोडे | पवल२– १६५८६– २०२२ | १/१२/२०२२ | सदनिका क्र. के २७०३, २७ वा मजला, बालाजी सिम्फोनी को. हौ. सो.लि. शिलोत्तर रायचूर. |
| ८ | सुधीर भालचंद्र रणापिसे, सपना सुधीर रणपिसे | विजय बन्सी उघडे | पवल३– ९५३९–२०२१ | १७/०६/२०२१ | सदनिका नं. ३०२, तिसरा मजला, डी विंग, निलांबरी को. हौ.सो. मीजे शिलोत्तर रायचूर. |
| ९ | चेनाराम चौधरी निर्मला चौधरी | रसूल मोहम्मद खान | पवल३–५३६– २०२३ | ९/१/२०२३ | सदनिका नं. ए ०२, तळ मजला, बिल्डींग टाईप २ साक्षी पार्क को. हौ. सो. मौजे पालीदेवद. |
| १० | अश्विनी धर्मराज चौधरी, धर्मराज मनोहर चौधरी | नामदेव इंटरप्रायजेस तर्फे प्रोप्रा. नेहा नरेंद्र धाडवे | पवल ४–१३४५० –२०१५ | २६/१०/२०१५ | सदनिका नं. २०२, दुसरा मजला, बी विंग, प्रयाग आंगण को.ही. सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ११ | किर्ती व्ही.कुलकर्णी विश्वास शंकर कुलकर्णी | दिशा सालीयन | पवल३– २१४११४ २०२२ | १९/१२/ २०२२ | सदनिका नं.२२०६, बाविसावा मजला, आय विंग, इगील को. हौ.सो. बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १२ | संतोष रामचंद्र सावंत | सतीश रामचंद्र सावंत, कविता रामचंद्र सावंत | पवल २– ७५०– २०२३ | १३/०१/ २०२३ | सदनिका नं. बी १०२, पहिला मजला, साक्षी पार्क टाईप ४, को. हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| १३ | राहूल दादाराव सावळे, स्वाती राहूल सावळे | कृष्णकांत धर्मा मोरे | पवल २– ७६– २०२३ | ३/१/२०२३ | सदनिका नं. एफ ०४, तळ मजला, बि.नं. २, स्वर्णभूमी कॉम्प्लेक्स, को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १४ | मोनालिसा विवेक आंग्रे | संतोष वासुदेव सावंत | पवल २– ११३३६–२०११ | २२/१२/ २०११ | सदनिका नं. १२, दुसरा मजला, सुयोग को. हौ.सो. मौजे शिलोत्तर, रायचूर |
| १५ | नताशा नवीन मेंडन | प्रकाश चंद्रकांत ढसाळ, वंदना प्रकाश ढसाळ | पवल ५– ३१६०– २०२२ | २४/०२/ २०२२ | सदनिका नं. १४०७, चौदावा मजला, आय विंग, बालाजी सिम्फोनी को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १६ | भुराराम कसाजी चौधरी | चंद्रकांत चाहु पोपेटा | पवल २– ४८६५–२०२२ | ३०–०३– २०२२ | गाळा क्र. १, तळ मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मालमत्ता क्र. ७३ मौजे शिलोत्तर रायचूर. |
| १७ | दिपक बाळकृष्ण चौधरी, तृप्ती दिपक चौधरी | विनायक बाळकृष्ण चौधरी | पवल ४– २०७८–२०२० | २४/०२/ २०२० | सदनिका नं. सी १०३, पहिला मजला, टाईप ३ ए, साक्षी पार्क, को. हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| १८ | संदिप सुरेश आंबोलकर | स्मिता सुरेश मयेकर | पवल ५– १७०४३– २०२१ | २८/१२ २०२१ | सदनिका नं. सी २०३, दुसरा मजला, जम्नोत्री सागर को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर, |
| १९ | रतीलाल भिकाजी चौधरी | चंद्रकांत चाहु पोपेटा | पवल २– ४८६६– २०२२ | ३०/०३/ २०२२ | गाळा क्र.४, तळ मजला, पोपेटा प्रॉपर्टीज, मालमत्ता क्र.७३ मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २० | वैशाली सचिन लगारे | ज्ञानेंद्र कुमार व्दिवेदी दिव्या ज्ञानेंद्र व्दिवेदी | पवल २– ९९०९– २०२२ | १३/०७/ २०२२ | सदनिका नं. सी २०१, दुसरा मजला, कार्तिक्य गार्डन फेज २, न्यू कार्तिक्य को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २१ | विनोद चंद्रकांत सताने, चंद्रकांत गोविंद सताने | नंदकुमार श्रीधरन | पवल ४– ७२०८– २०१६ | १६/०८/ २०१६ | सदनिका नं. बी ३०१, तळ मजला, नंदकिशोर को. हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| २२ | जितेंद्र पुंडलिक हरणे, सुकेशिनी जितेंद्र हरणे | अविनाश शांताराम कांबळे, आसावरी अविनाश कांबळे, सुधीर शांताराम कांबळे, प्रमोद शांताराम कांबळे, नितीन शांताराम कांबळे, स्वप्निल शांताराम कांबळे | पवल ५– ६१५२– २०२२ | ८/४/२०२२ | सदनिका नं. ८, पहिला मजला, साई कृपा को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २३ | श्वेता संदेश पाटील | आकाश किशोर चौधरी | पवल १– १०६४०– २०२२ | ९/९/२०२२ | सदनिका नं. सी ००२, तळ मजला, गंगा दर्शन को. हौ.सो. मौजे पालीदेवद. |
| २४ | रुपाली नरेश बाणे, जागृती नरेश बाणे | प्रशांत विष्णू पाटील | पवल २– १६४४० २०२२ | २८/११/ २०२२ | सदनिका नं. १०६, पहिला मजला, बी विंग, श्री राम दर्शन को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २५ | सचिन शंकर लगारे, वैशाली सचिन लगारे | मारूती वैजनाथ शिंदे वैशाली मारूती शिंदे | पवल ३– २०३०५ २०२२ | २/१२/ २०२२ | सदनिका नं. बी २०१, दुसरा मजला, बी विंग, न्यू कार्तिक्य को. हौ.सो. मौजे शिलोत्तर रायचूर. |
| २६ | अमोल संभाजी परब, अश्विनी अमोल परब | बेबीताई नारायण भगत मे.पी.एम इन्फा प्रोजेक्ट तर्फे पॉवर ऑफ ॲटर्नी होल्डर भागीदार प्रदिप नामदेव म्हात्रे | पवल २– १६६२१– २०२२ | १/१२/ २०२२ | सदनिका नं. १०३, पहिला मजला, बाबा कुंज बिल्डिंग, मौजे पालीदेवद. |
| २७ | राजेंद्र महादेव पारेख, शर्मिला राजेंद्र पारेख | मे. नील बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे विलास मदनलाल कोठारी तर्फे जयवंत एकनाथ भोपी | पवल ४– ७२८१– २०१८ | ७/६/२०१८ | सदनिका नं. १०२, पहिला मजला, नील अपार्टमेंट, मौजे पालीदेवद, |
| २८ | बिजू नारायणन | राजीव पी. नारायणन, पी. व्ही नारायणन | पवल१– ०७६३३– २००६ | ६/१०/ २००६ | सदनिका नं.सी १, तळ मजला, श्री सावन नगरी को. हौ. सो, मौजे पालीदेवद. |
| २९ | बिजू नारायणन | पी.व्ही. नारायणन, राजीव पी. नारायणन | पवल १– ०७६३२– २००६ | ६/१०/ २००६ | सदनिका नं.सी २, तळ मजला, श्री सावन नगरी को. हौ. सो, मौजे पालीदेवद. |
| ३० | रघुनाथ शाशिकांत सडेकर | हेमंत बाळकृष्ण निंबाळकर | पवल३– २४०६– २०२३ | १०/२/ २०२३ | सदनिका नं. १०३, पहिला मजला, एफ विंग, बि.नं. ५, साई इन्क्लेव्ह को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३१ | राहुल महादेव कदम, कोमल राहुल कदम | गजानन भगवान पाटील मे. नवनाथ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे पंढरीनाथ चांगदेव ठाकूर | पवल २– १६५९१– २०२२ | १/१२/ २०२२ | सदनिका नं. ३०१, तिसरा मजला, ए विंग, नवनाथ कृपा को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३२ | टेड्डीसन थुंडीथील चोरी | उमेश सुधाकर पावसकर | पवल २– १४५१–२०२३ | ३०/०१/ २०२३ | सदनिका नं.सी. ००१, तळ मजला, बि. नं. २, साक्षी पार्क २, को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३३ | नाना शनिवार पाटील | विजय रामचंद्र भगत | पवल ३– ११८३ २०२३ | १९/०१/ २०२३ | सदनिका नं. १०२, पहिला मजला, बाबा कुंज, मौजे पालीदेवद. |
| ३४ | निलेश नारायण शेळके | प्रदिप जनार्दन घासे | पवल२–३०० २०२३ | ५/१/२०२३ | सदनिका नं. १०२, पहिला मजला, रिव्हयू को. हौ. सो, मौजे पालीदेवद. |
| ३५ | संजय बी. बेंद्रे, संजना संजय बेंद्रे | राजाराम नाना जाधव | पवल १– ७५८३– २०२२ | २३/०६/ २०२२ | सदनिका नं.बी २०१, दुसरा मजला, बि.नं. जी १, श्रीनिकेतन को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३६ | आशा विनायक कांबळे, सूर्यकांत विनायक कांबळे | किशोर गजानन पाटील मे. राम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | पवल २– ९००२–२०२२ | २३/०६/ २०२२ | सदनिका नं. ३०९, तिसरा मजला, ए विंग, श्री राम दर्शन को. हौ. सो, मौजे शिलोत्तर रायचूर. |
| ३७ | प्रशांत दिलीप चेउलकर, मधुरा प्रशांत चेउलकर | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स तर्फे रामानुज शर्मा | पवल २– ३२२६–२०२२ | ४/३/२०२२ | सदनिका नं. ४०३, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद. |
| ३८ | महेंद्र वामन मांजरेकर रजनी महेंद्र मांजरेकर | मे. गिरजा कन्स्ट्रक्शन्स तर्फे श्री रामानुज शर्मा | पवल २ ६५८६– २०२२ | ४/५/२०२२ | सदनिका नं. ३०४, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद. |
| ३९ | विजय कृष्णा चव्हाण, कृष्णा हरी चव्हाण | प्रताप रामचंद्र आरेकर प्रिया प्रताप आरेकर श्वेताली प्रताप आरेकर | पवल १– १७७७– २०२३ | २४/०२/ २०२३ | सदनिका नं. २५०४, जे विंग, २५ वा मजला, बालाजी सिम्फोनी, मौजे शिलोत्तर रायचूर. |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद,**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# जुईनगर-शिरवणे रेल्वे भुयारी मार्ग धोकादायक

## साठणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जुईनगर-शिरवणे रेल्वे भुयारी मार्ग वाहनचालकासह नागरिक, महिला व शालेय विद्यार्थ्यांसाठी धोकादायक स्पॉट बनला आहे. जुईनगरमधील नागरिकासाठी शिरवणे व एल पी नेरूळमार्गे जाणाऱ्या या भुयारी मार्गाच्या खालील असणारे बंदिस्त गटार नादुरुस्त अवस्थेत असून तेथून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या जीवावर ते बेतू शकेल अशी स्थिती आहे. गटाराच्या दुर्गंधीयुक्त व केमिकलयुक्त पाण्याचा निचरा होत नसून घाण पाणी चाचलेल्या स्थितीत असते. वाहन चालक आणि नागरिकांसाठी ते धोकादायक ठरत आहे.

जुईनगर, जुईपाडा गाव, नेरूळ सेक्टर २मधील स्थानिक नागरिकांना शिरवणे गाव तसेच नेरूळ एल पी मार्गाकडे ये-जा करण्यासाठी जुईनगर-शिरवणे रेल्वे भुयारी मार्गातून जाणारा रस्ता जवळचा आणि सुलभ असल्याने या मार्गातून दररोज हजारो नागरिक ये-जा करत असतात. या शिवाय शिरवणे गाव ही बेलापूरपट्टीतील महत्त्वाची बाजारपेठ असून दर रविवारी येथे मोठा बाजार भरत असतो त्यामुळे खरेदी विक्रीसाठी नेरूळमधील क्षेत्र २ सारसोले येथील नागरिक याच भुयारी मार्गातून ये-जा करित असतात.

शिरवणे विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज व माता अमृतानंद विद्यालयात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी व त्यांचे पालक याच भुयारी मार्गावरून ये-जा करत असतात, मात्र मागील पाच-सहा महिन्यांपासून भुयारी मार्गाच्या ठिकाणी असणारे बंदिस्त गटार नादुरुस्त अवस्थेत असल्याने येथून मार्गक्रमण करणे धोकादायक ठरत आहे. भुयारी मार्गाजवळ असणारे बंदिस्त गटार नादुरुस्त बनले असून वाहन चालक आणि पादचाऱ्यांसाठी जीवघेणे होत आहे. इथं गटाराच्या पाण्याचा निचरा होत नसल्याचे दुचारी वाहन स्लिप होऊन दुर्घटनेच्या घटना सातत्याने घडत असतात तसेच वेगात येत असलेल्या वाहनांमुळे दुर्गंधीयुक्त सांडपाणी चक्क पदचाऱ्याच्या अंगावर येत असल्याने तारेवरची कसरत करत वेगवान वाहनांना चुकवत मार्गक्रमण करावे लागते.

**जुईनगर-शिरवणे रेल्वे मार्गातील बंदिस्त गटाराच्या दुरुस्तीचे काम सहा महिन्यांपूर्वी केले आहे. येथे मनपाने पावसाच्या वाहत्या पाण्याचा निचरा व्हावा याकरिता १० हॉर्स पॉवर इंजिनचे दोन पंप बसवले आहेत. येथील बंदिस्त गटाराची पाहणी करून साफसफाई, दुरुस्ती आणि पुढील कारवाई त्वरित करण्यात येईल.**

**-पंढरीनाथ चवडे, उपअभियंता, नवी मुंबई, मनपा**

---

## निवडक

### दिवाळे कोळीवाड्यात होलिकोत्सव



**नवी मुंबई :** दिवाळे कोळीवाडा येथे होळी उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी दिवाळे ग्रामस्थांच्या वतीने हरिचंद्र कोळी या दाम्पत्यांना मान देण्यात आला होता. अग्नी दिल्यानंतर कोळी बांधवानी पारंपरिक कोळी नृत्य करत होळी भोवती फेर धरला होता. होळीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी रात्री अग्नी लावलेल्या होळीच्या राखेचा टिळा लावून संपूर्ण कोळीवाड्यात रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली. तर या दिवशी गावातील चौका चौकात डीजेच्या तालावर तरुण मंडळी नृत्य करून एकत्रित जेवणाचं बेत करतात.

### प्रकाश गायकवाड यांना पुरस्कार



**मोहोपाडा :** रसायनी येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रकाश गायकवाड यांना पुणे येथील एका कार्यक्रमात पद्मश्री डॉ. गिरीश प्रभुणे, बिग बॉस फेम तृप्ती देसाई, शिक्षणमहर्षी राजाराम परब यांच्या हस्ते राष्ट्रीय लक्षवेध जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यात पुणेरी टोपी, शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आदी देवून गौरविण्यात आले. याअगोदरही गायकवाड यांना त्यांच्या कार्यांबद्दल विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### कडापेतील वणवा विझवण्यात यश

**नवी मुंबई :** उरण तालुक्यात सारडे गावाच्या दक्षिणेकडे कडापे गावालगत असलेल्या लिम डोंगर येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वणवा लागला होता. पर्यावरणवादी कार्यकर्ते अंगराज म्हात्रे व राकेश शिंदे यांनी झाडांच्या ओल्या फांद्या घेत वणवा विझवण्यात सुरुवात केली. त्यात त्यांना यश आले. याबाबतच माहिती वशेणी येथील निसर्गमित्र अंगराज म्हात्रे यांनी कळवताच फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन)सर्पमित्र, निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर-उरण चे सदस्य राकेश शिंदे यांनी त्वरित उरण वनखात्याचे डिविलकर आणि संतोष इंगोले यांना संपर्क करून दिली, मात्र तोपर्यंत वणवा विझवला. अंगराज म्हात्रे व राकेश शिंदे या तरुणांच्या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### सत्याग्रह महाविद्यालयात परिसंवाद

**नवी मुंबई :** खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात स्त्री हक्क आणि सामाजिक संस्थांची जबाबदारी या विषयावर जागतिक महिला दिनानिमित्त प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्रारंभी, परिसंवादाचे उद्घाटन प्रा. वनिता सूर्यवंशी यांनी राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले, माता रमाई आंबेडकर, माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला वंदन करून केले. प्रा. डॉ. निधी पटेल, प्रा. एलोरा मित्रा, प्रा. संगीता जोगदंड, प्रा. ललिता यशवंते, प्रा. सुनिता वानखेडे यांनी परिसंवादात देश हितासाठी महिलांचे सबलीकरण आवश्यक असल्याचे विचार उपस्थितांनी मांडले.

---

## बुद्ध विहार व्यवस्थापन कायदा जनसमर्थन अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनात नुकताच धम्म संहिता : बुद्ध विहार व्यवस्थापन कायदा, जनसमर्थन अभियान या कार्यक्रम झाला. यामध्ये दि धम्म संहिता ॲक्शन कमिटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय मुख्य समन्वयक प्रा. ॲड. दिलीप काकडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब मर्चंडे हे होते. तसेच महेंद्र मोरे, काशिनाथ कांबळे, सुनील वाघपंजे, राजेश लोखंडे, अमरीश मेश्राम, मुकुंद रोटे, संदीप साबळे, सुशिल जंगलबाग आदिंनी या अभियानास शुभेच्छा दिल्या.

दि धम्म संहिता ॲक्शन कमिटी ऑफ इंडियाच्या वतीने १८ ते ५ मार्चपर्यंत पोलादपूर तालुक्यापासून 'धम्म संहिताः बुध्द विहार व्यवस्थापन कायदा, जनसमर्थन अभियान कार्यक्रमाला सुरुवात करून रायगड जिल्ह्यातील चौदा तालुक्यात जनजागृती करण्यात आलेली आहे. येत्या १५ मार्चला मुंबईत धरणे आंदोलन होणार आहे. त्यावेळी सर्व बौध्दांनी सहभागी होण्याचे आवाहनही या वेळी करण्यात आले.

## नवी मुंबईत डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारावा -आठवले

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा नवी मुंबईत त्वरित उभारावा, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. रिपब्लिकन पक्षाचा नवी मुंबई शहर जिल्ह्याचा कार्यकर्ता मेळावा नवी मुंबईत विष्णूदास भावे नाट्यगृहात आयोजित करण्यात आला होता. त्यात प्रमुख मार्गदर्शन करताना रामदास आठवले बोलत होते.

या वेळी विचारमंचावर रिपाइंचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष महेश खरे, स्वागताध्यक्ष सिद्राम ओवळ, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, सुरेश बारशिंग, एम एस नंदा, रिपाइंचे मराठा आघाडीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष बाळासाहेब मिरजे, डॉ. विजय मोरे, ॲड. बी. के. बर्वे, शिलाताई बोदडे, विजय कांबळे, शशिकला जाधव, यशपाल ओव्हाळ, चांदू जगताप, एल. आर. गायकवाड, सचिन कटारे, कविता भंडारे, सुरेश कोरे आदी उपस्थित होते.

या वेळी जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर कर्तृत्ववान महिलांचा ना. आठवले यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

## महिला दिनी बेवारस जखमी महिलेला जीवदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा होत असताना, एका बेवारस जखमी महिलेला जीवदान मिळवून देण्याचे कौतुकास्पद कार्य आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांनी केले आहे.



गव्हाण फाटा येथे एक अज्ञात महिला जखमी अवस्थेत आढळली होती. या महिलेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. बेवारस महिलेला मुळची गुजरात राज्यातील व महाराष्ट्रामध्येही काम करणारी सेवा यज्ञ समिती या स्वयंसेवी संस्थेकडे सुपूर्द करण्याचे पत्र पोलिसांनी पाठविले होते. त्यानुसार या संस्थेने महिलेवर उपचार करण्यासाठी रुग्णवाहिका मिळविण्यासाठी हालचाल केली, मात्र होळी असल्याने रुग्णवाहिका मिळत नव्हती, म्हणून अमर म्हात्रे यांनी आमदार महेश बालदी यांच्या मोफत रुग्णवाहिकेचा लाभ सेवा यज्ञ समिती या संस्थेला मिळवून दिला. त्यानुसार तत्काळी बेवारस जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता या महिलेवर उपचार सुरू असून तिला जीवदान मिळवून देण्यात आले.

## केबीपी कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**



रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये प्रगत नॅनो मटेरियलवर आधारित ३ व ४ मार्च रोजी दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

मुंबई विद्यापीठाच्या प्रा. वैशाली बांबोळे, इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजीचे प्रा. आर. आर. देशमुख आणि ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भगुरे यांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन झाले. या परिषदेसाठी देश-विदेशातून २३८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेमध्ये ४० संशोधन प्रबंध व ५० पोस्टर प्रदर्शित करण्यात आले.

सर्व मान्यवरांनी प्रगत नॅनोमटेरियल्स हे तंत्रज्ञान भविष्यात कसे उपयोगी आहे हे सांगितले. या परिषदेत प्रा. विनू अजयन, प्रा. ओगले, प्रा. नितीन देसाई, प्रा. हयाशी, प्रा. दीपक दुबल, डॉ. भट्टाचार्य यांनी नॅनोमटेरियल वर व्याख्याने दिली. जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने या परिषदेला उपस्थित राहिले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांच्या मार्गदर्शनाखाली भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विभागाने या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. परिषदेचे समन्वयक म्हणून डॉ. उल्का सूर्यवंशी यांनी तर संयोजक म्हणून डॉ. पुजारी व डॉ. गवळी यांनी काम पाहिले.परिषदेला उपप्राचार्या डॉ. राजेश्री घोरपडे, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पनवेल : जागतिक महिला दिनानिमित्त ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लि., पाडेघर येथील कार्यालयात कर्मचारी महिलांचा सन्मान करण्यात आला. या वेळी जगदीश घरत, सुधाकर थवई, स्मिता जाधव, जयश्री पाटील, श्रुचिता गोंधळी, श्री. त्यागी, आनंद लाल आदी उपस्थित होते.**

---

# नारीशक्तीला सलाम!

**जागतिक महिला दिनानिमित्त दैनिक रामप्रहरच्या वतीने विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या नारीशक्तीच्या यशोगाथेचा यथोचित आढावा घेऊन त्यांना अनोखा सलाम करण्यात आला.**

## समाजसेवी व्यक्तिमत्व राजश्री मुंबईकर

असे म्हणतात की, प्रत्येक मनुष्य आपल्या जीवनात अनेक भूमिका निभावत असतो ! पण काही व्यक्तीमत्व अशी असतात की त्यांना काही विशेष उपजत कला गुण अवगत असतात त्यातीलचं एक नावं म्हणजेच राजश्री राजेंद्र मुंबईकर.

उरण-गावठाण येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एक आदर्श शिक्षिका म्हणून कार्यरत असून उरण, पनवेल, कर्जत शिक्षक पतपेढीच्या दोन वर्ष चेअरमन आणि पाच वर्षे उपचेअरमन पद भुषविणाऱ्या त्या एक उत्तम नाट्य कलाकार आहेत. एक उत्तम गायिका आहेत. एक सामाजिक कार्यकर्त्या आणि निसर्गावर प्रेम करणाऱ्या निसर्गप्रेमी, सर्पमित्रदेखील आहेत. राजश्री (राणीताई) मुंबईकर यांनी एस.ई.झेड. या नाटकात केलेल्या अभिनयाकरिता महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले होते. ह्याच नाटकाच्या माध्यमातून जनतेत झालेली जनजागृती आणि लोकांनी दिलेला सेझ विरोधी अभूतपूर्व प्रचंड लढा यामुळे उरण, पेण, पनवेल या तीन तालुक्यात होऊ घातलेला सेझ हद्दपार झाला.



याचसोबत शिक्षण क्षेत्रात काम करत असताना गरीब गरजूवंत विद्यार्थ्यांच्या व आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता केलेल्या उल्लेखनीय कार्यासोबतच आपले पती सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांच्या खांद्याला खांदा लावत सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत. या समाजसेविकेला सिने अभिनेते मयुरेश कोटकर यांच्या हस्ते विशेष सेवा पुरस्कार या मानाच्या पुरस्काराने सन्मानीतदेखील करण्यात आले.

**शब्दांकन : विठ्ठल ममताबादे, उरण**

## सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सोनाली बुंदे

रायगड जिल्ह्यात सतत काही नवीन काम करणाऱ्या सोनाली धीरज बुंदे यांचे कार्य उल्लेखनीय आहे. सह संचालिका मिशन आयएएस, प्रिंसिपल लिटिल हार्ट्स प्री स्कूल उरण आदी विविध पदावर सोनाली बुंदे कार्यरत आहेत. द्रोणागिरी भूषण, कुलाबा जीविन गौरव पुरस्कार प्राप्त सोनाली बुंदे या संपूर्ण भारतात १ रुपयामध्ये आयएएसचे प्रशिक्षण देणाऱ्या भारतातील पहिल्या महिला आहेत.



डॉ पंजाबराव देशमुख मिशन आयएएस अकॅडमीच्या त्या सह-संचालिका आहेत. सोनाली यांचा २००५ पासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुरू झाला. मुलींना नेहमी वेगळी वागणूक का मिळते ह्या वर त्यांनी लेख लिहले. समाजासाठी खूप काही करायचे आहे ह्या भावनेने त्या असंख्य स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन शिबिर भरवितात. आजपर्यंत अनेक ठिकाणी त्यांनी एमपीएससी, यूपीएससीची तयारी करणाऱ्या स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना निशुल्क मार्गदर्शन केले. गरीब मुलांना शिक्षणाची मदत कशी करता येईल यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. सक्षम स्त्रीजात कशी बनवतात येईल ह्यासाठी वेग वेगळे उपक्रम त्या राबवितात. स्वतः च्या आयुष्यात खूप संघर्ष पाहिला असल्यामुळे, इतर स्त्रीला, मुलांना कशी मदत करता येईल ह्याकडे त्या जातीनी लक्ष देतात.

लीगल एड कॅम्प त्या घेतात. हेल्थ चेकअप कॅम्पसाठी त्या नेहमी अग्रेसर असतात. किती तरी मुलांचे समुपदेशन त्या निशुल्क करतात. मानसिक आणि शारीरिक सक्षम पिढी त्यांना बनवायची आहे त्यासाठी त्या कार्य करत असतात.

**शब्दांकन : विठ्ठल ममताबादे, उरण**

## सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उद्योजिका श्लोक पाटील

उरणमधील दि चाईल्ड प्रॉडिजि इंटरनॅशनल प्रीस्कूलच्या संस्थापक संचालिका तसेच माई या एनजीओच्या संस्थापिका आणि कुटुंबिनी संघाची सह-संस्थापक अध्यक्षा आणि सह संचालिका श्लोक निखील पाटील यांचा जीवनप्रवास त्यांच्याकडून जाणुन घेऊयात.

श्लोक पाटील यांचे शिक्षण पदवीधर आणि रिटेल मॅनेजमेंट व एच. आर. ट्रैनिंगमध्ये डिप्लोमा हे आहे. त्या मिसेस महाराष्ट्र गॉर्जियस २०२३-२४ची विजेत्या आहेत.



त्या सांगतात की, लहानपणापासून समाजसेवेची आवड असल्याने समाजातील लोकांना मदत करण्याचा माझा छंद आहे. मी यंदा विविध शाळांमध्ये १४०० सॅनिटरी पॅड्स शाळेतील मुलींना वाटप करून त्यांना मासिक पाळी व त्या मध्ये कशी काळजी घायची या बद्दल माहिती दिली.

मी गेली १ ४ वर्षांपासून फॅशन आणि मॉडेलिंग मध्ये प्रशिक्षण देत आहे. माणगाव येथे श्रम जीवी परिवार पुरस्कार या साठी नामांकित केले आहे. लहान पणापासूनच फॅशनची आवड होती आणि शिक्षिका म्हणून खेळ खेळायला सुद्धा आवडायचे, पण जेव्हा मला मुलगी झाली तेव्हा एक शिक्षिका म्हणून व्यवसाय निवडले. त्या सोबतच टॅलेंट आणि फॅशन शोमध्ये असलेली माझी आवड त्या क्षेत्रात सुद्धा काम केले.

या सर्व कार्यामध्ये माझ्या परिवाराकडून खूप साथ व समर्थन मिळाले. माहेरहून आणि सासरकडून खूप प्रेम व साथ मिळाली. स्वतःला सिद्ध करण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागले. नेहमी आपली आवड आणि काम सोबत ठेऊन मेहनत घेतली. शैक्षणिक, सामाजिक व फॅशन क्षेत्रासाठी वेळ दिला.

**शब्दांकन : दिनेश पवार, उरण**

## महिला पोलीस अधिकारी सरला काळे

गावापासून बारा किमीपर्यंत शिक्षणाची सोय नाही, त्यातच घरची परिस्थिती आणि आर्थिक परिस्थितीने ग्रासलेले घर, गावापासून तीन किमीपर्यंत साधी आगपेटी मिळण्याची व्यवस्था नाही, आणि सर्वात महत्त्वाचे आदिवासी पारधी समाज म्हणजे समाजाने कायम गुन्हेगारीचा शिक्का मारलेला समाज,याच समाजातून सरला एस. काळे या पोलीस अधिकारी झाल्या.

हंगेवाडी जि. धाराशिव (उस्मानाबाद) या अतिशय ग्रामीण भागातील खेडेगावात सरला काळे यांचा जन्म झाला. सन २००८ साली अहमदनगर येथे महीला पोलीस कॉन्स्टेबल म्हणून भरती झाल्या. पोलीस सेवा करत त्यांनी हिंदी हा विषय घेऊन एमए ही पदवी प्राप्त केली. त्यांच्या कार्याची दखल, त्यांची मेहनत, पोलीस दलाची सेवा पाहता रायगडचे पोलीस अधीक्षक घार्गे यांनी त्यांना पोलिस कॉन्स्टेबल असल्यापासून मार्गदर्शन केल्याचे सांगून आपल्याला ते पितृस्थानी आहेत, असे सांगितले.



पोलीस कॉन्स्टेबल असताना अतिशय चिकाटीने अभ्यास करून त्या महाराष्ट्र लोक सेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर २०१४ साली पोलीस उपनिरीक्षक झाल्या. रायगड जिल्ह्यातील खालापूर पोलीस ठाण्यात दाखल होण्यापूर्वी त्या संवेदनशील असलेल्या वसई, विरार, नालासोपारा येथे कर्तव्य बजावले आहे. एक उत्कृष्ठ कबड्डी खेळाडू म्हणून त्यांचा लौकिक आहे. आतापर्यंत त्यांनी ४८ पदके प्राप्त केली आहेत. खालापूर येथे आल्यापासून त्यांनी महिला अत्याचार, बाल अत्याचार अशा ३० गुन्ह्यांची उकल केली आहे. स्वतः एक उत्कृष्ठ समुपदेशकार आहेत. महिलांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यांचे निरसन त्या करतात.

**शब्दांकन : अर्जुन कदम, चौक**

## निवडक

### रोह्यात होळी उत्साहात



**रोहे :** ब्राह्मण मंडळ रोहातर्फे सोमवारी होळी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथेप्रमाणे रोह्याच्या श्रीराम मारुती चौकात ब्राह्मण मंडळ रोहा कार्यकारणी सदस्य श्रीकांत पिंगळे यांच्या हस्ते होळीचे यथोचित पुजन करण्यात आले, वे. मु. सुधीर बोडस गुरुजी यांनी पौरोहित्य केले. उपक्रम यशस्वी होण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष अमित आठवले, उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, सहसचिव मकरंद गोविलकर, खजिनदार चैतन्य आठवले, कार्यकारिणी सदस्य प्रकाश कुंटे, सुहास फडके, सुमित रिसबुड, उदय गोखले ,प्रसाद गुळवणी, जितेंद्र वझे, विदुला परांजपे आदींसह सर्व समाजबांधवांनी अथक परिश्रम घेतले.

### संत तुकाराम महाराज बिजोत्सव

**पेण :** पेण तालुक्यातील धोंडपाडा व तुकारामवाडी येथे जगद्गुरू संत तुकाराम बिजोत्सव साजरा करण्यात येत असून यानिमित्त ३ मार्च पासून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. या वेळी पहाटे काकड आरती, ज्ञानेश्वर वाचन, गीता पारायण, प्रवचन, हरिपाठ कीर्तन असे कार्यक्रम होत आहेत. कार्यक्रमाची सांगत काल्याच्या कीर्तनाने होईल. १० मार्च रोजी बीजोत्सव साजरा होत असून या वेळी पंचक्रोशीतील भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन धोंडपाडा व तुकारामवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

### मंडल अधिकारी सुनील जाधव सेवानिवृत्त

**नागोठणे** : नागोठणे तलाठी सजाचे मंडल अधिकारी सुनील यशवंत जाधव हे वयाच्या ५८ वर्षांनी सेवानिवृत्त सुनील यशवंत जाधव यांचे मूळ गाव माणगाव धरणाची वाडी येथील रहिवासी असून ३७ वर्ष त्यांनी वीस तलाठी सजांमध्ये तसेच दोन वर्ष मंडल अधिकारी पदावर उत्तम प्रकारे सरकारी खात्यामध्ये काम काम केले या ठिकाणी काम करत असताना त्यांना कुठले वादाशी किंवा कुठल्याही वाईट प्रसंग अशी सामना करावा लागला नाही. कारण त्यांचा मुलाचा स्वभाव शांत होता. सर्वांना समजून घ्यायचे आलेल्या शेतकऱ्यांना पण समजून सांगायचे त्यामुळे तहसीलदार मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार समारंभ घेण्यात आला. या सत्काराला नायब तहसीलदार थोरात तसेच नायब तहसीलदार भोईर मॅडम आदी तहसील कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होत. शेवटचे मंडल अधिकारी पदावरून निवृत्त होताना त्यांच्यासोबत त्यांची फॅमिलीसुद्धा हजर होते अशा सर्वांच्या प्रेम भावनेने त्यांचे रोहा तहसील कार्यालयात सत्कार करण्यात आले.



# कोशिंबळे धरणाची पाणी पातळी खालावली

## ▪ पहुर धरणाच्या पाण्यासाठी निजामपूर ग्रामपंचायतीचे जिल्हाधिकाऱ्यांना साकडे

**माणगाव : प्रतिनिधी**

निजामपूर ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा करणाऱ्या काळनदीवरील कोशिंबळे धरणातील पाण्याची पातळी मार्च महिन्यातच खालावल्यामुळे नागरिकांच्या तोंडचे पाणीच पळाले आहे. यंदाचे वर्षी पाणी टंचाईचे निजामपूर ग्रामपंचायतीवर संकट उभे असताना या नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत पाणी पुरवठा सुरळीत व पुरेसा व्हावा यासाठी निजामपूर ग्रामपंचायतीचे सरपंच राजाभाऊ रणपिसे यांनी योग्य ती खबरदारी व दक्षता घेत तातडीने रायगड जिल्हाधिकारी जिल्हा जलसंधारण अधिकारी, माणगाव उपविभागीय अधिकारी यांना लेखी निवेदनातून पहूर धरणाचे पाणी काळ नदी पात्रात सोडावे अशी मागणी करीत साकडे घातले आहे.



निजामपूर ग्रुप ग्रामपंचायत हद्दित ४ महसुल गावे व २७ वाडया असुन त्यांची लोकसंख्या सुमारे १६ हजार असुन या गावाला गेली अनेक वर्षापासून कोशिंबळे धरणाच्या पाणी साठ्यातून पाणी पुरवठा करण्यात येत होता. परंतु हे धरण ४० वर्षापूर्वी बांधलेले असुन त्यांची २०१५/२०१६ मध्ये विशेष दुरूस्ती करण्यात आली होती. परंतु सिल लेवलच्या खालचे थरातून मोठया प्रमाणात या धरणाला गळती होत असल्याने पाणी नदीपात्रात वाहून गेल.

ही पाणी योजना धरणाच्या वरील भागात असल्याने पाणी पुरवठा विहिरीत पाणी साठत नाही. पुर्ण क्षमतेने भरलेले हे धरण सद्य स्थितीत कोरडे पडले आहे. दरवर्षी हे धरण कोरडे पडते त्यामुळे निजामपूरला उन्हाळ्यात पाणी टंचाई भासते. येत्या १० दिवसांत ग्रामपंचायत निजामपूर हद्दीत पाणी टंचाई उद्भवणार असल्याने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे निजामपूर ग्रामपंचायतीने पाणी टंचाईपूर्वीच उपाययोजना म्हणून पहूर धरणाचे पाणी काळ नदी पात्रात सोडण्याची मागणी केली आहे.

### पाणीपट्टी भरण्याची तयारी

**निजामपूर ग्रुप ग्रामपंचायतीने गेल्यावर्षी पहुर धरणाचे पाणी सोडण्याची मागणी शासन दरबारी केली होती त्यानंतर पहूर धरणाचे पाणी काळ नदीत सोडले होते. त्यामुळे ग्रामपंचायत निजामपूरच्या पाणी टंचाईचा प्रश्न सुटला होता. मृद जलसंधारण उप विभाग कोलाड अंतर्गत असणाऱ्या पहुर लघु पाटबंधारे या योजनेतून प्रतिदिन ५०० घनमिटर पाणी नियमित काळ नदी पात्रावरील मौजे भाले येथून सोडल्यास येणाऱ्या पाणी टंचाईचे निवारण होईल अशी अशा नागरिकांना वाटत असून पहुर लघु पाटबंधारे या योजनेतून प्रतिदिन ५०० घनमिटर पाणी सोडल्यानंतर शासनाने ठरविलेल्या दराप्रमाणे होणारी पाणीपट्टी भरणेस ग्रामपंचायत तयार आहे.**

# रोह्यात बालगोपाळांनी लुटला धुळवडीचा आनंद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात होळी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. बाल गोपाळांसह वृध्दांपर्यंत अनेकानी रंगांची उधळण करीत या उत्सवाचा आनंद लुटला. यंदा धुळवडीचा दिवस मंगळवारी आल्याने तिखट सण साजरा करता न आल्याने अनेकांचा हिरमोड झाला.



रोहा तालुक्यात नागोठणे वगळता १८१ सार्वजनिक व ५७ खाजगी एकूण २३७ होळ्यांना अग्नी देण्यात आले. सोमवारी दुपारपासून होळी सजवण्यास ग्रामीण भागातील लोकांनी सुरूवात केली होती. वयोवध्द तरूण व लहान मुलानी आपल्याला जमेल त्या पध्दतीने आपापली होळी रचली. यंदा पुर्वा फालगुनी पौर्णिमा सकाळीच लागल्याने होळी पूजनासाठी वेळेची बंधने नव्हती. तालुक्यातील बहुतांशी ठिकाणी होलीका मातेला रात्री ९.३० ते १२.०० दरम्यान अग्नी देण्यात आली. रंगाची उधळण करण्यात असली. यंदा मंगळवार असल्याने सोबतीला मांसाहार नसल्याने काहींचे हिरमोड झाले. तरिही लोकांनी या सणात रममान होत धमाल केली. सकाळपासूनच लहान मुलांनी रंगाची उधळण करण्यास सुरूवात केली. ११ च्या सुमारास उत्सवाला रंगत चढल्याचे चित्र ग्रामीण भागासह शहरात दिसून आले. रंगाची खरेदी होत असताना दारूच्या दुकानातही गर्दी होती. या वर्षी होळी उत्सावाच्या दरम्यान पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तालुक्यासह शहारात कोणताही अनुसुचित प्रकार घडला नाही.

# कर्जतमध्ये गुटखा विक्री; टपरीचालकावर कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात राजरोसपणे पान टपरीवर गुटख्याची विक्री होत होती. त्याकडे कर्जत पोलीस ठाण्याचे दुर्लक्ष होत असे मात्र दोन दिवसांपूर्वी एलसीपीने या पान टपरीवर गुटख्याची विक्री होत असताना त्याला रंगेहाथ पकडले व त्यावर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत २ मार्च रोजी मौजे सचिन पान स्टॉल, मयुरा हॉटेलसमोर कर्जत येथे आरोपी रा. बुध्द विहाराचे मागे, गुंडगे, ता.कर्जत याने महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या व आरोग्यास अपायकारक असलेल्या १,७६०/- रुपये किमतीचा गुटखा हा स्वत:चे फायद्याकरीता आपले पान टपरी या दुकानात विक्री करीत असताना जवळ बाळगल्याच्या स्थितीत मिळुन आला. या गुन्ह्यातील आरोपीस २ मार्च रोजी अटक करण्यात आली आहे. याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५२/२०२३ भा.दं. वि.क. ३२८, २७२, २७३, १८८ , अन्नसुरक्षा व मानके कायदा २००६ नियम व नियमन २०११ चे कलम २६(१),२६(२),२६(२), २७(२, २७ (३)( प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोसई महेश धोंडे करीत आहेत.

# माणगाव कोस्ते खुर्द येथील आदिवासी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**माणगाव : प्रतिनिधी**

कोस्ते खुर्द आदिवासीवाडीतील अनेक ग्रामस्थांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला कंटाळून महाड, पोलादपूर. माणगाव विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते महाड ढालकाठी येथे आमदारांच्या निवासस्थानी ६ मार्च रोजी शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी पुरुष व महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. यावेळी निजामपूर भागातील शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मनोज सावंत, सुधीर पवार, जयेंद्र मोरे, मंगेश पाटेकर, मंगेश खराडे, गणेश पवार, महेंद्र बेटकर, सचिन मोरे, परशुराम मोरे, दिलीप पवार यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### ▪ मदतीसाठी प्रयत्नशील –आमदार भरत गोगावले

*या वेळी आमदार भरत गोगावले यांनी पक्ष प्रवेश केलेल्या कोस्ते खुर्द आदीवासीवाडीतील ग्रामस्थांना त्यांचे प्रश्न व अडचणी समजून घेऊन आपण कोस्ते खुर्द आदिवासी ग्रामस्थांना जास्तीत जास्त विकासनिधी देऊन प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन दिले. आपण शिवसेनेवर दाखवलेल्या विश्वासाला कदापीही तडा जावू देणार नाही, अशी ग्वाही दिली.*



# नेरळमध्ये शिवजन्मोत्सव साजरा

## उत्सव समितीच्या विविध कार्यक्रमांना प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती नेरळ गावामध्ये सार्वजनिक स्वरूपात साजरी केली जाते. शिवजन्मोत्सव सोहळ्याचे निमित्ताने नेरळमध्ये तीन दिवस वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. शिवचरित्रावर आधारित रंगावली स्पर्धा, मोफत आयुर्वेदिक आरोग्य चिकित्सा शिबिर आणि भव्य मिरवणूक तसेच बाल नाट्य आयोजित करण्यात आले आहे.

नेरळमध्ये गेली ५५ वर्षे सार्वजानिक स्वरूपात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीप्रमाणे साजरी केली जाते. यंदा १० मार्च रोजी तिथीप्रमाणे शिवजयंती आली असून नेरळ सार्वजनिक शिवजयंती उत्सवाचे ५६ वे वर्ष आहे. यावर्षी शिवजयंती उत्सव सोहळ्यात ९ मार्च रोजी शिवचरित्रावर आधारित रंगावली आणि चित्र स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शहरातील बापूराव धारप सभागृह येथे या स्पर्धा होणार आहेत तर १० मार्च रोजी त्याच सभागृहात मुंबई दादर येथील ज्योवीस आयुर्वेद हॉस्पिटल यांचे मोफत आयुर्वेदिक चिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले आहे. डॉ. राज सातपुते आणि डॉ. ज्योती सातपुते यांच्यासह या रुग्णालयाचा २५ डॉक्टर आरोग्य समुपदेशक यांचा सहभाग असणार आहे. या शिबिरामध्ये आलेल्या रुग्णांना नारी सामाजिक संस्था दादर यांच्याकडून सर्व औषधे मोफत दिली जाणार आहेत. तसेच रुग्णांची तपासणीदेखील मोफत केली जाणार आहे. ११ मार्च रोजी नेरळ गावातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मी छत्रपती शिवाजी महाराज बोलतोय हे बाल नाट्य सादर होणार आहे.



१० मार्च रोजी सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक काढली जाणार आहे.त्यात घोडे, हत्ती, बाल शिवाजी, मावळे, वारकरी सांप्रदाय यांचे भजन, चित्ररथ आणि ढोल पथक यांचा सहभाग असणार आहे. या सर्व कार्यक्रमांचे नियोजन नेरळ शिवजयंती उत्सव समिती यांच्याकडून केले जात असून समितीचे सर्व कार्यकर्ते यांच्याकडून दिवसरात्र एक करून उत्सव सोहळा यशस्वी करण्यासाठी जोरदार तयारी सुरू आहे.

नेरळ शिवजयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्थापन केलेल्या स्वराज्यातील गड किल्ले येथून शिवज्योत आणत असतात. यावर्षी सातारा जिल्ह्यातील किल्ले अजिंक्यतारा येथून शिवज्योत आणली जाणार आहे. २० तरुणांचे पथक नेरळ येथून ७ मार्च रोजी रवाना होणार असून ८ मार्च रोजी किल्ले अजिंक्यतारा येथून पायी शिवज्योत नेरळकडे रवाना होणार आहे. दोन दिवस प्रवास करून ते शिवप्रेमी तरुण नेरळ येथे १० मार्च रोजी सकाळी पोहचणार आहेत.

# दीपक फाऊंडेशनच्या आधार कार्ड शिबिरास प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

दीपक फाउंडेशन रोहा व दिपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने तालुक्यातील किल्ला, वाशी, तळाघर या ग्रामपंचायत कार्यालयात नवीन आधार कार्ड तसेच आधार अपडेट शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दीपक फाउंडेशन रोहा व दिपक नायट्रेंट कंपनी धाटाव यांच्यावतीने ग्रामीण भागात राबविण्यात येत असलेला 'संगाथ' प्रकल्पांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन ठीक ठिकाणी करण्यात येत आहे. प्रकल्प मोठा लाभदायक ठरत असून या प्रकल्पांतर्गत तालुक्यातील ४३ गावे, वाड्या व वस्त्यावर शासकीय योजनांची माहिती व लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर जन सुविधा केंद्राची स्थापना करून मार्गदर्शनाचे कार्य केले जात आहे. तसेच गावागावात विविध शासकीय योजनांची माहिती देवून विविध शिबिराचे आयोजन केले जात आहे. त्याच कार्यक्रमाचा भाग म्हणून या शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देण्यात आली आहे. शिबिरचा १४१ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. सांगाथ प्रकल्प समन्वयक प्रवीण ठोसर, सुपरवायजर गुलाब भगत, संगाथ फॅसीलेटर व पोस्ट विभागाचे दयानंद यागलवार यांनी शिबिरासाठी मेहनत घेतली.

आधार शिबिराचा विशेषकरून शाळेतील व नवजात मुला-मुलींना खूप फायदा झाला. तर या शिबिरासाठी ग्रामस्थ, ग्राम पंचायत यांनी केलेल्या मोलाचे सहकार्याबद्दल दीपक फाउंडेशन रोहा व दीपक नायट्रेट कंपनी धाटाव यांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.



# दिघी येथे वाचन कोपरा कक्षाचे उद्घाटन



**मुरुड : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय आणि ज्यु कॉलेज दिघी येथे अदानी फाऊंडेशनकडून देण्यात आलेल्या तीन पुस्तकांची कपाटे, गोष्टीची पुस्तके व इतर पुस्तकांचे हस्तांतरण फित कापून करण्यात आले.

कार्यक्रमाला संस्थेचे चंद्रकांत तलवातकर, मुख्याध्यापक सचिन मापुस्कर, अदानी फाऊंडेशनच्या वरीष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे व अवधूत पाटील, दिघी येथील अदानी फाऊंडेशनच्या सौजन्याने सुरू असलेल्या दवाखान्याचे डॉ. मुकेश श्रीवर्धनकर उपस्थित होते. प्रास्ताविक वर्षा भट यांनी केले.

अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेडकडून सर्वच शाळांना वाचनालय उपलब्ध करून देण्यात आले आहे. सोबतच पुस्तक ठेवायला कपाटसुद्धा देण्यात आले आहे. त्याचबरोबर शाळेतील मुलांना अदानी फाऊंडेशनच्या पुस्तकाचे प्रदर्शन ठेवण्यात आले. या कार्यक्रमात मुख्याध्यापक सचिन मापुस्कर यांनी शाळा कायम विना अनुदानित इंग्रजी शाळा असल्याने येणारे अडचणी अदानी फाऊंडेशनकडे मांडल्या व त्या सोडविण्यासाठी आपले सहकार्य खूप मोलाचे आहे हे आपल्या भाषणातून सांगितले.

# भारत-ऑस्ट्रेलिया पुन्हा भिडणार

## आजपासून अहमदाबाद येथे चौथी कसोटी

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर-गावसकर कसोटी मालिकेतील चौथा व शेवटचा सामना अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुरुवार (दि. ९)पासून खेळला जाणार आहे. चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय संघ २-१ने पुढे आहे. त्यामुळे सामना रंगतदार होण्याची चिन्हे आहेत.

या कसोटी स्पर्धेत भारतीय संघाने पहिले दोन सामन्यात ऑस्ट्रेलियाचा दारुण पराभव केला, पण तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पुनरागमन केले. त्यामुळे जागतिक अजिंक्यपद कसोटी (डब्ल्यूटीसी) चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात प्रवेश करण्यासाठी अहमदाबाद येथे होणारा चौथा कसोटी सामना भारताला जिंकणे अनिवार्य आहे.



इंदौर येथे झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव करून डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्याचा तिकिट निश्चित केले आहे. भारत किंवा श्रीलंकेचा संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध या अंतिम सामन्यासाठी मैदानात उतरु शकतो. भारताने चौथ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाला धूळ चारली, तर डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्यासाठी भारताची जागा पक्की होईल. अहमदाबादमध्ये होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यात भारताचा पराभव झाला किंवा सामना रद्द झाला, तर अंतिम सामन्यासाठी श्रीलंकेच्या न्यूझीलंड दौऱ्यात खेळवल्या जाणाऱ्या दोन कसोटी सामन्यांचा निकाल पाहावा लागेल.

### भारतीय प्लेईंग ११मध्ये बदल होण्याची शक्यता

शेवटच्या कसोटी सामन्यात भारतीय संघात यष्टीरक्षक आणि फलंदाज केएस भरतच्या जागेवर इशान किशनला पदार्पण करण्याची संधी मिळू शकते. इंदोर कसोटीमध्ये मोहम्मद शमीला विश्रांती देण्यात आली होती. उमेश यादवने चांगली गोलंदाजी केली, पण शमी अनुभवी गोलंदाज आहे. त्यामुळे त्याचा समावेश केला जाऊ शकतो. श्रेयस अय्यरला बाहेर करून सूर्यकुमार यादवचा संघात समावेश होऊ शकतो.

## जसप्रीत बुमराहवर यशस्वी शस्त्रक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाला एक चांगली बातमी मिळाली आहे. टीम इंडियाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या पाठीवरची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.

न्यूझीलंडमध्ये झालेल्या शस्त्रक्रियेनंतर बुमराहला मैदानात परतण्यास किमान सहा महिने लागू शकतात. तो वनडे विश्वचषकापूर्वी तंदुरुस्त झाल्यास पुनरागमन करेल.

## सीएचए आधार चषक स्पर्धा

**उरण : बातमीदार**

अपघातग्रस्त सीएचए बंधूंच्या मदतीसाठी निधी उपलब्ध व्हावा या दृष्टिकोनातून न्हावा शेवा सीएचए संघटनेतर्फे दरवर्षी सीएचए आधार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या वर्षी ही स्पर्धा येत्या रविवारी (दि. १२) उरण तालुक्यातील पिरकोन येथील धोंडू काका मैदानात होणार आहे.

उरण तालुक्यात अनेक अपघात होत असतात. अपघातप्रसंगी गोरगरिबांना आर्थिक संकटालाही सामोरे जावे लागते. उरण तालुक्यातील अपघातग्रस्त सीएचए बंधूंच्या आर्थिक मदतीसाठी क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. या स्पर्धेला खेळाडू, प्रेक्षकवर्गाचा प्रतिसाद मिळत असतो. यंदाही स्पर्धा होत असून सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे.




# रायगडचा सिनियर क्रिकेट संघ जाहीर

## अभिषेक खातूकडे कर्णधारपदाची धुरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे घेण्यात येणाऱ्या अमंत्रितांच्या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी रायगडचा सिनियर क्रिकेट संघ जाहीर करण्यात आला आहे. संघाच्या कर्णधारपदी अभिषेक खातू याची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.



रायगड जिल्ह्याचा सिनियर क्रिकेट संघ निवडण्यासाठी २५ व २६ जानेवारी रोजी पेण नगर परिषदेच्या मैदानावर निवड चाचणी घेण्यात आली. या चाचणीतून ४५ जणांची निवड करण्यात आली. त्यांचे तीन संघ तयार करून नागोठणे येथील रिलायन्स इंडस्ट्रीज मैदानावर या तीन संघांचे सामने खेळविण्यात आले. त्यातून २५ जणांची निवड करून त्यांचे सराव शिबिर तेथेच घेण्यात आले.

रायगड संघांचे रत्नागिरी, लांजा व मालवण येथे सामने खेळविण्यात येणार आहेत. रायगडाचा संघ एकूण पाच सामने खेळणार आहे. १० व ११ मार्च रोजी रत्नागिरी येथील कोळंबे गावातील मैदानावर रायगडचा पहिला सामन खेळला जाईल. २५ जणांमधून पहिल्या दोन सामन्यांसाठी १४ जणांची निवड करण्यात आली आहे.

योगेश पवार व अरुण तरे यांच्या निवड समितीने रायगडचा संघ निवडला. निवड चाचणी व्यवस्थापक म्हणून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रकाश पावसकर यांनी काम पाहिले. असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, उपाध्यक्ष अनिरूद्ध पाटील, संदीप पाटील, सुहास हिरवे, सुयोग चौधरी, रिलायन्स नागोठणेचे रोहिदास घोडेकर, उदय दिवेकर, विश्वनाथ उतेकर उपस्थित होते.

**असा आहे संघ**

अभिषेक खातू (कर्णधार), हर्ष मोगाविरा, मल्हार वंजारी, प्रतिक म्हात्रे, निकूंज विठलानी, देवांश तांडेल, समीर आवासकर, तहा चिचकर, रितेश तिवारी, विक्रांत जैन (यष्टीरक्षक), सुबोध शिवलकर, विघ्नेश पाटील, श्रीशैल्य माळी, सुमित सोनवडेकर, राखीव उत्तम परमार, संकेत गोवारी, अभिषेक पाटील, भावेश पाटील, अनिकेत कामत, यश माने. सौरभ साळवी, राहूल नवखारकर, अभिषेक जैन, यश पाटील, नशिब नाईक.

# एनएमपीएलमध्ये ठाणे टायगर्सचा विजयी 'चौकार'

**ठाणे : प्रतिनिधी**

श्रीराज घरतची ३४ धावांची नाबाद फलंदाजी आणि जय धात्रक, सुमित मारकली यांचे प्रत्येकी तीन बळी यामुळे ठाणे टायगर्सने सानपाडा स्कॉर्पियन्सचा आठ विकेट्सने लीलया पराभव करून माझगाव क्रिकेट क्लब आयोजित पहिल्या नवी मुंबई प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत सलग चौथा साखळी सामना जिंकला. अपराजित ठाणे संघाने आठ गुणांसह अव्वल आघाडी गाठली आहे, तर सानपाडा स्कॉर्पियन्स अजूनही पहिल्या साखळी विजयासाठी आतुर आहे.



दादोजी कोंडदेव स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात ठाणे टायगर्सने नाणेफेक जिंकून सानपाडा संघाला प्रथम फलंदाजी दिली. ठाण्याच्या जय धात्रक (१३ धावांत तीन बळी), सुमित मारकली (१४ धावांत तीन बळी), हेमंत बुचडे (१० धावांत दोन बळी) यांच्या अचूक गोलंदाजीमुळे सानपाडाचा डाव १९.४ षटकांत केवळ ८३ धावसंख्येवर संपुष्टात आला. सलामीवीर साहिल गोडे (३३ चेंडूंत २३ धावा) व श्रीराज घरत (३१ चेंडूंत नाबाद ३४ धावा) यांच्या दमदार फलंदाजीमुळे ठाणे टायगर्सने १४व्या षटकाला २ बाद ८४ अशी विजयी धावसंख्या सहज गाठली. जय धात्रकला सामनावीर पुरस्काराने क्रिकेटप्रेमी डॉ. हुमायून जाफरी व प्रवीण घेवारी यांनी गौरविले. सोबत एनएमपीएलचे चेअरमन शाह आलम शेख, प्रदीप कासलीवाल, अभिषेक घोष, भूपेंद्र सिन्हा आदी उपस्थित होते.






**उलवे नोड : देशातील सर्वांत मोठी ग्रामीण क्रिकेट स्पर्धा केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील चषक २०२३ भिवंडीतील अंजुर येथे नुकतीच झाली. या स्पर्धेत जीवदानी स्पोर्ट्स बामणडोंगरी संघ विजेता ठरला. या संघातील खेळाडूंनी पारितोषिक स्वरूपात मिळालेल्या ११ टू व्हिलर बाईकसह जल्लोष केला.**




**Silver Jubilee Ceremony**
Saturday, 11th March 2023 at 03:00 p.m.

Chief Guest
Hon'ble Shri. Chandrakantdada Patil
Higher and Technical Education Minister, Government of Maharashtra

President
Hon'ble Shri. Ramsheth Thakur, *Ex-M.P.*
Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel

Guests of Honour
Hon'ble Shri. Prashant Thakur — MLA, Panvel & Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Mahesh Baldi — MLA, Uran
Hon'ble Shri. Dnyaneshwar Mhatre — MLC, Konkan Teacher Constituency
Hon'ble Shri. Arunsheth Bhagat — President, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Y. T. Deshmukh — Vice-Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel

In Presence of
Hon'ble Dr. Kavita Choutmal — Ex-Mayor, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Paresh Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel & Ex-Leader of the House, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Mrs. Sitatai Patil — Ex-Deputy Mayor, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Anil Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Mrs. Varsha Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Harishchandra Patil — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Sanjay Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Mrs. Raj Aloni — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Bharat Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Sanjay Patil — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Prakash Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Eknath Gaikwad — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Manohar Mhatre — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Jayant Pagade — President, Panvel City B.J.P
Hon'ble Shri. Nitin Patil — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Mrs. Dhanashri Y. Kadam — I/c Principal, Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel
Dr. Rupendra Gaikwad — Principal, Ramsheth Thakur College of Commerce & Science, Kharghar
Dr. D.S. Narkhade — Co-ordinator, Silver Jubilee Ceremony
Prof. (Dr.) S.K. Patil — Principal, C. K. T. A. C. S. College, New Panvel (Autonomous)
Dr. S.T. Gadade — Secretary, J.B.S.P. Sanstha, Panvel

**Felicitation Ceremony**
Sunday, 12th March 2023 at 04.00 p.m.

Chief Guests
Hon'ble Dr. Vijay Khole — Former Vice-Chancellor, University of Mumbai
Hon'ble Dr. S.N. Pathan — Former Director of Higher Education, Maharashtra & Former Vice-Chancellor, Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University
Hon'ble Dr. Anil Patil — Chairman, Rayat Shikshan Sanstha, Satara

President
Hon'ble Shri. Ramsheth Thakur, *Ex-M.P.*
Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel

Guests of Honour
Hon'ble Shri. Prashant Thakur — MLA, Panvel & Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Arunsheth Bhagat — President, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Y. T. Deshmukh — Vice-Chairman, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Dr. Naresh Chandra — Former Pro Vice-Chancellor, University of Mumbai
Hon'ble Dr. Ajay Bhamare — Acting Pro-Vice Chancellor, University of Mumbai
Hon'ble Dr. Vijay Joshi — Former Senior Consultant, RUSA

In Presence of
Hon'ble Dr. Kavita Choutmal — Ex-Mayor, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Paresh Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel & Ex-Leader of the House, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Mrs. Sitatai Patil — Ex-Deputy Mayor, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Anil Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Mrs. Varsha Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Harishchandra Patil — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Sanjay Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Mrs. Raj Aloni — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Bharat Thakur — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Sanjay Patil — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Prakash Bhagat — Member, Board of Executives, J.B.S.P. Sanstha, Panvel
Hon'ble Shri. Eknath Gaikwad — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Manohar Mhatre — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Hon'ble Shri. Jayant Pagade — President, Panvel City B.J.P
Hon'ble Shri. Nitin Patil — Ex-Corporator, Panvel City Municipal Corporation
Mrs. Dhanashri Y. Kadam — I/c Principal, Bhagubai Changu Thakur College of Law, New Panvel
Dr. Rupendra Gaikwad — Principal, Ramsheth Thakur College of Commerce & Science, Kharghar
Prof. (Dr.) B.S. Patil — Incharge, Faculty of Arts
Prof. (Dr.) S.B. Yadav — Incharge, Faculty of Commerce
Dr. (Mrs.) J.S. Thakur — Incharge, Faculty of Science
Prof. (Dr.) B.D. Aghav — IQAC Coordinator
Prof. (Dr.) S.K. Patil — Principal, C. K. T. A. C. S. College, New Panvel (Autonomous)
Dr. S.T. Gadade — Secretary, J.B.S.P. Sanstha, Panvel

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **—मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com